म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ४८९८

REFBK-0019542
REFBK-0019542

१०५७२

# अनुक्रमणिका


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना ... ... ... | १ |
| २ | समर्पण ... ... ... | १२ |
| ३ | **काव्यकान्तार ( काव्य )** | |
| | प्रकरण पहिलें ... ... ... | १ |
| | ,, दुसरें, ... ... ... | ५ |
| | ,, तिसरें ... ... ... | ११ |
| | ,, चवथें ... ... ... | २२ |
| | ,, पाचवें ... ... ... | ४० |
| **इतर काहीं कविता** | | |
| ४ | नवीन धर्मावताराची चूर्णिका ... ... | ६७ |
| ५ | लपलेला गंधर्व ... ... ... | ८१ |
| ६ | भोवऱ्याचा खेळ ... ... ... | |
| | प्रथम परिच्छेद ... ... ... | ८३ |
| | द्वितीय परिच्छेद ... ... ... | ८९ |
| ७ | द्वैतांची फुगडी ... ... ... | ९५ |
| ८ | कुंजवीणा ... ... ... | १०३ |
| ९ | मी ... ... ... | १०८ |
| १० | नुऱ्याचें गाणें ... ... ... | ११० |

# प्रस्तावना

हें काव्य मी इ. स. १९०९ सालीं लिहूं लागलों. लहानपणापासून काव्य व तत्वज्ञान ह्यांविषयीं मला अत्यंत आवड होती, व आपणहि कविता करावी अशी अत्यंत प्रबल इच्छा माझ्या अंतःकरणांत अनेक दिवस—नव्हे कांहीं वर्षें—घोळत होती. माझा एक त्या वेळचा लहानपणचा स्नेही अति कर्णमधुर पण बहुधा अर्थविहीन अशी कविता करी, आणि त्याच्या कविता ऐकून तर आपल्याला कविता करितां येत नाहींत म्हणून मला अतिशय वाईट वाटे. पुष्कळ वेळां अशा मनोवृत्तींत असतांना मी देवाला व दैवाला रागानें व निराशेनें बोल देत असें. पण जसजशा त्या स्नेह्याच्या अधिकाधिक कविता ऐकण्यांत आल्या, जसजसे असे मनाच्या उत्कट निराशेचे आणि मनोभंगाचे प्रसंग अनेक येऊन गेले, तसतशी अर्थात् कविता लिहिण्याची उत्कंठा अधिकाधिक तीव्र आणि दुस्सह, आणि अर्थात् अधिकाधिक दुःखदायकहि होत गेली. अखेरीस सारखें वजन वर राहिल्यानें मोठमोठ्या इमारती देखील शेवटीं ढांसळतात, तसें कांहीं होऊन छंदोबद्ध वाणीचें प्रतिबंधक असें माझ्या मनांतलें अगर मेंदूतलें कांहीं तुटून पडलें म्हणा, अगर फार यत्न करितां करितां खिळ्यानेंहि एखादें उत्तमपैकीं कुलूप देखील उघडून जातें, तसें कांहीं माझ्यांत कोठें झालें म्हणा, काय असेल तें मला सांगतां येत नाहीं; पण एके दिवशीं एलिचपूर मुक्कामीं असतां (ता. ७–७–१९०९ रोजीं) सकाळीं विचारांत गढून गेलों असतां ह्या उत्कंठेचा भार असह्य होऊनच कीं काय, एकदम एकादें कपाट उघडावें तसें माझ्या मनांत एक कपाट उघडलें, आणि आपण कविता करावीच—आपण करणारच—आपल्याला कविता करतां येणारच—किंबहुना आलीच—आपल्याला कविता सुचूं लागली—आतां लिहिली मात्र पाहिजे, अशी कांहीं तरी एक भावना उत्पन्न होऊन मी शाळेच्या

अभ्यासापैकींच एक वही घेतली, व लागलींच काव्याची आज सुरुवात, म्हणून त्यावर परमेश्वरस्मरणपर व परमेश्वराचा धावा केल्यासारखी बारा पंधरा ओळींची एक गद्य प्रस्तावना लिहिली, व तेच दिवशीं संध्या-काळीं " काव्यरंभीं नमन " म्हणून पांच सहा श्लोकांची, नांवाप्रमाणें कविता करूं लागण्यापूर्वी आरंभीं प्रभुवंदन म्हणून एक कविता सुरू करून लवकरच—मला वाटतें दुसरेच दिवशीं—मीं ती पुरी केली. " अभिनव-काव्यमाले " च्या तिसऱ्या भागांत श्रीयुत रा. रा. नरसोपंत केळकर यांनीं मजविषयीं लिहितांना म्हटल्याप्रमाणें ही माझी अगदीं पहिली कविता होय आणि ह्या कवितेनंतर दुसरे तिसरेच दिवशीं सुरू केलेलें माझें दुसरें कवन म्हणजे प्रस्तुत काव्य होय. प्रभुचरणांचें वंदन ही वेगळी कविता न मानतां तें केवळ पहिलें मंगल मानिल्यास ही माझी पहिलीच कविता होय. असो. मला कांहीं त्या दिवशीं काव्याची अलौकिक स्फूर्ति आली, किंवा अमुक असुक दिवशीं अशा अशा रीतीनें माझी " प्रतिभा " "जागृत झाली," किंवा मला असा हा लोकोत्तर चमत्कार घडून मी एकदम असामान्य, जगांत विरळाच आढळून येणारा अजब महाकवि बनलों आहें, असें भासविण्याचा, हें सर्व लिहिण्यांत—प्रस्तुत काव्याच्या प्रारंभाचा इतिहास इतका बारकाईनें लिहिण्यांत—माझा हेतु नाहीं; किंवा मला काव्याची स्फूर्ति आली, किंवा माझी प्रतिभा जागृत झालेली आहे किंवा मी महाकवि आहें, असें मी म्हणतही नाहीं. पण त्या दिवशींच्या त्या क्षणापासून—माझ्या कविता कशाहि असोत, त्या कशा आहेत हें ठर-विणें वाचकांचें काम आहे, पण त्या दिवशींच्या त्या क्षणापासून—माझ्या मनाची तरी एक मोठी उत्कट इच्छा, एक मोठी आस पुरली आहे आणि पुरत आहे, आणि म्हणून तो दिवस व तो क्षण मला प्रिय आहे; आणि असें आहे म्हणूनच, हें काव्य कांहीं अलौकिक स्फूर्तीनें निर्माण झालें आहे असें दाखविण्याकरितां नव्हे, तर केवळ मला स्वतःला तो क्षण प्रिय आहे आणि मंगल वाटतो म्हणूनच केवळ माझ्या काव्यप्रय-त्नाच्या ह्या अगदीं पहिल्याच प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत येथें मी त्याचा प्रेमानें व आदरानें निर्देश करून ठेविला आहे.

अगदीं प्रथम प्रस्तुत काव्य हें मोठें काव्य म्हणून लिहिण्याचा इरादा नसून फक्त "अद्यापि मी कधीं रमणीय काव्यवनाची शोभा पाहिलेली नाहीं, आतां मी ती पाहण्यास जाणार आहें" येवढ्याच अर्थाची, प्रभुवंदनानंतर कवितारचनेच्या नवीन उद्योगास प्रास्ताविक म्हणून एक लहानशी कविता लिहिण्याचा विचार होता; व त्याप्रमाणें वीसपंचवीस श्लोकांची ही कविता मीं तयारहि केली होती. आणि अर्थात् आपण केलेल्या ह्या नव्या शतक्रतूपासून मला त्या वेळीं अतिशय आनंदहि झाला होता. पण पुढें हा माझा शतक्रतु जेव्हां प्रिय सुहृज्जनांच्या पुढें उजेडांत आला, तेव्हां त्यांनीं, अति सौम्य शब्दांत, पण मला त्याची खरी किंमत समजून सांगितली, व मग ही कृति विशेष सुंदर करण्यास काय काय करणें इष्ट किंवा जरूर आहे, ह्याचा खल सुरू झाला. कांहीं तुटक तुटक तर कांहीं व्यवस्थित अशा सूचनाहि पुढें आल्या. मीं ह्या सूचना ऐकल्या; त्यांतल्या कांहीं अजीबात सोडून दिल्या; कांहीं जशाच्या तशाच ग्रहण केल्या; कांहींना अधिक व्यवस्थित व नीटनेटकें स्वरूप देऊन त्या विशेष जुळत्या व माझ्या कल्पनेप्रमाणें अधिक सुंदर केल्या; कांहीं कल्पना व वर्णनें मनानें काढून ठरवलीं; व ह्या सर्वांस एका सूत्रांत ओंवील असा विचाराचा एक धागा ठरवून व प्रस्तुत काव्याचें कांहींएक विशिष्ट धोरण, स्वरूप व साध्य ध्येय मनापुढें ठेवून मग पुनः हें काव्य प्रस्तुत स्वरूपांत व्यवस्थितपणें यथाशक्ति लिहिण्यास प्रारंभ केला. असें ह्या काव्याचें परिवर्तन एकच वेळ झालें, अगर अशा प्रकारची प्रिय सुहृज्जनांची मदत प्रारंभीं एकच वेळ झाली, असेंहि नाहीं. एकदोन वर्षांतच पुनः एक वेळ असाच परिवर्तनाचा प्रसंग प्रस्तुत काव्यावर येऊन गेला, व नुकताच हा प्रथमखंड वेगळा छापून काढण्याचा विचार सुरू झाला त्या वेळेपासून म्हणजे कांहीं महिन्यांपासून ह्या काव्याच्या पुढल्या कांहीं भागांसंबंधीं असाच विचार पुनः चालू झाला आहे. पण झाला आहे इतका हा भाग निश्चित झाला आहे, व म्हणून हा प्रथम खंड आतां अशा स्वरूपांत वाचकांपुढें मांडण्याचें ठरलें आहे. तसें पाहूं गेलें असतां खरोखर आतां हें काव्य सुरू करून पूर्ण आठ वर्षें होऊन गेलीं, व आतां हें कोठें अर्धें उरकलें

आहे. असें होण्याचीं कारणेंहि अनेक आहेत. बरेच वर्षांचें मनाच्या व देहाच्या प्रकृतीचें विचित्र अस्वास्थ्य, ज्या विशिष्ट मनोवृत्तींत प्रस्तुत काव्य लिहिणें जरूर होतें त्या मनोवृत्तींचा मागील कारणास्तव अभाव, कांहींहि लिहिलें तरी तें बरेच दिवस, निदान तीन महिने तरी, घरात ठेवल्यावर व त्यावर कांहीं झोंप घेऊन व नंतर आपण आपल्या व आणखी एका विशिष्ट माणसाच्या दृष्टीनें त्यांतील दोष शक्य तितके काढून व तें लेखन आपल्याच्यानें करवेल तितकें चांगलें केल्यावरच सामान्यतः छापण्यास पाठविण्याचा माझा निश्चय, काव्य सबंध पूर्ण झाल्यावर एकदमच सबंधच्या सबंध प्रसिद्ध करूं ही आशा, वगैरे वगैरे अनेक कारणें जातां जातां येथें सांगतां येतील, पण त्यांपैकीं एकाचाहि मी येथें अधिक लांबलचक विस्तार करीत बसत नाहीं. हें काव्य सुरू करून इतकीं वर्षें होऊन गेलीं तरी अजून ह्याला पुरें होण्यालाहि अशींच आणखी कांहीं वर्षें लागतील असें मला वाटतें. आणि अगदीं खरें म्हणजे मी इतकें मनापासून व श्रमानें लिहिलेलें हें माझें काव्य माझ्या जन्मांत माझ्या हातून पुरें होणार नाहीं. असें हें काव्य सुरू केल्यानंतर थोड्याच वर्षांपासून मला कांहीं कारणामुळें उगीच वाटूं लागलें आहे, व अजूनहि, आजसुद्धां मला तसेंच वाटत आहे. असें वाटण्याचींहि कारणें अनेक आहेत; पण त्यांपैकीं एकाचाहि येथें नुस्ता निर्देश करण्याची देखील माझी इच्छा नाहीं. भविष्य काळीं काय वाढून ठेवलेलें आहे, हें कोणाला—निदान माझ्यासारख्या सामान्य माणसाला तरी, कळत नाहीं. तेव्हां, माझी बुद्धि जरी अल्प असली, किंवा माझी कुवतच थोडी असली, तरी माझी लहानशीच कुवत कसोशीनें वापरून मी कांहीं वर्षें खपून, जगताला निरुपयोगी असलेल्या माझ्या आयुष्यांतील मुख्य काम म्हणून जें हें काव्य लिहिलें आहे व लिहित आहें, तें जगताच्या दृष्टीनें जरी कितीहि निरुपयोगी, निरस किंवा वाईट असलें, तरी मला माझ्या दृष्टीनें, आपलें पुढें कांहींहि होण्यापूर्वीं तें काव्य किंवा त्याचा कांहीं भलाबुरा कसाहि भाग ह्या पहिल्या खंडाच्या रूपानें, मराठी वाङ्मयावर प्रेम करणारांच्या दृष्टीपुढें आपण धाडस करून टाकला, येवढें तरी समाधान हा भाग प्रसिद्ध

झाल्यावर (झालाच तर) माझ्या मनाला अन्तापर्यंत राहणार आहे.

ज्या प्रिय सुहृज्जनांचा मी दोनतीन वेळ मागें निर्देश केला, त्यांच्या मदतीसंबंधीं म्हटलें, तर त्यांची मदत मला इतकी वारंवार झाली आहे, इतकी अमोल झाली आहे, व इतकी महत्त्वाची झाली आहे कीं, खरोखरीच जर ह्या काव्यांत कांहीं सौंदर्य व मौज असेल, तर तिचें सर्व श्रेय मी मनोभावानें आणि अन्त:करणापासून त्यांना देण्याला तयार आहें. पण असें असून मला त्यांचे येथें आभार मानणें मात्र शक्य नाहीं. त्यांचें माझें नातेंच असें आहे कीं, हा आभारांचा पाश्चात्य पद्धतीचा निस्स्नेह थिल्लर शिष्टाचार मी करीत बसलों, तर त्या पूज्य चरणांचा, माझ्यासारख्या खरोखरीच जगतांत सर्वस्वी निरुपयोगी असणाऱ्या यःकश्चित् व्यक्तीवर ज्यांनीं आजपर्यंत इतक्या दयाळूपणें इतकें अलोट आणि गाढ प्रेम केलें, आणि मला ह्या कठिण जगतांत जीवित शक्य केलें,—सुसह्य केलें,—इतकेंच नव्हे तर गोड केलें, ज्यांनीं अनेक मानसिक आणि शारीरिक आणीबाणीच्या प्रसंगीं मला धावून मदत केली आणि माझ्यासारख्या व्यक्तीचे देखील ह्या जगतांत अनेक वेळ प्रत्यक्ष प्राण वांचविण्याचे अहेतुक श्रम केले—मी पुनः मनापासून म्हणतों—इतकें सर्व ज्यांनीं मजकरतां केलें, त्या दयाळ अन्तःकरणांचे आभार मानण्याचा पाश्चात्य पद्धतीचा निस्स्नेह थिल्लर शिष्टाचार मी जर करीत बसलों, तर त्या थोर, दयाळ आणि उदार अन्तःकरणांची मी निव्वळ थट्टा केल्यासारखें होईल, त्या उदात्त अन्त:करणांचा मी निव्वळ उपहास केल्यासारखें होईल असें मला वाटतें, व म्हणून मी नाइलाजानें येथें बोलणेंच सोडून देतों. ज्यांनीं आयुष्यांतलें सगळेंच दिलें त्यांना परत द्यावें तरी काय? आणि ज्यांचा मीच सर्वस्वी आहें, त्यांचे आभार तरी कसे, कोणत्या रीतीनें, आणि कोणत्या तोंडानें मानणार? आणि म्हणून ज्या भक्तीनें ते मला पूज्य आहेत, त्याच भक्तीनें माझें ह्या बाबतींत येथें तोंड बांधलेलें आहे. असो.

पुण्यास निघणाऱ्या "धर्मजागृति" नामक लहानशा पण थोर विषयांचा विचार करणाऱ्या सुंदर मासिकांत माझ्या आतांपर्यंत बऱ्याच कविता व "सर्वस्वाचीं गद्य गाणीं," "मोलवान् वस्तूंचा मोडका बाजार" वगैरे

कांहीं गद्य लेखन इत्यादि आज सुमारें तीन वर्षे प्रसिद्ध होत आहे, पण तें सर्व ह्या प्रस्तुत काव्याच्या मागून सुरू करून अर्धी पुरें झालेलें लेखन आहे, व म्हणून तें अर्धी प्रसिद्ध झालें आहे.

आतां ह्या काव्यांतील यमकांसंबंधीं, जोडाक्षरानें मागल्या अक्षराला येणाऱ्या गुरुत्वासंबंधीं व काव्याच्या कथानकासंबंधीं दोन शब्द लिहिले म्हणजे हा थोडा जास्त लांबलेला प्रस्तावनालेख पुरा झाला.

ह्या काव्यांतील यमकांसंबंधीं खुलासेवार लिहावयाचें म्हणजे खरोखरी अलीकडे कांहीं वर्षे सर्व हिंदुस्थानभर वेगळाल्या भाषांतून माजलेल्या सयमक व निर्यमक कवितेच्या वादांतच मला निमूटपणें हात जोडून शिरावयास पाहिजे, व यमकाच्या कल्पनेच्या योग्यायोग्यतेची, जरूरीबिनजरूरीची भवति-न-भवति जोरानें करून एखाद्या काव्याच्या प्रस्तावनेच्या मानानें डोळ्याला थोडीशी लांब दिसणारी प्रस्तुत काव्याची ही प्रस्तावना सहज चाळून पाहणाऱ्या वाचकाला सदर भवति-न-भवतीच्या रणानें भरलेलीं पानें नुसतीं निष्काळजीपणानें उलटून टाकण्याला भाग पाडिलें पाहिजे. पण इतकें दुःख मी माझ्या वाचकांनाहि द्यावयाला तयार नाहीं, व किंचित् कोणास येथें अस्थानीं वाटणाऱ्या ह्या वादग्रस्त विषयाचा ऊहापोह येथें करीत बसण्यासहि मी तयार नाहीं. पण अगदीं अत्यंत जरूर तेवढेंच ह्या विषयावरील विचार शक्य तितक्या थोडक्यांत सांगावयाचे म्हणजे असें म्हणतां येईल कीं, ( १ ) कविता हें विश्वगत सौंदर्याचें शाब्दिक व्यक्त स्वरूप आहे, कविता ही अन्तर्बाह्य सौंदर्यमय आहे—सौंदर्यासाठींच आहे, इतकेंच नव्हे, तर अन्तर्बाह्य सौंदर्य हाच खऱ्या कवितेचा प्राण आहे, आणि यमकानें कवितेच्या बाह्यांगाची सौंदर्यवृद्धि खास होते, सबब कवितेच्या कमी महत्वाच्या अंगाकडून का होईना पण यमक कवितेच्या प्राणभूत कल्पनेस किंवा प्राणास धरून आहे व त्याला आपल्या शक्तीप्रमाणें आपल्या आपल्या जागीं पोषक आहे, ह्मणून यमक मला इष्ट आहे; ( २ ) संमेल किंवा मेळ, प्रमाणशीरपणा, आणि एकतानता (Harmony) ही काव्यसौंदर्य व्यक्त होण्याची पद्धति आहे; आणि यमकाच्या कल्पनेंत हीं दोन्ही तिन्ही तत्वें अंतर्गत आहेत; म्हणून सयमक व निर्यमक कविता ह्यांत

निवड करणें झाल्यास सयमक कविताच काव्य व्यक्त करण्यास पात्र किंवा विशेष योग्य व क्षम आहे. आणि म्हणूनहि यमक इष्ट आहे; (३) माझी अशी एक कल्पना आहे कीं, एका परीनें यमक म्हणजे खरोखरी वर्णोच्चारांत व्यक्त झालेली उपमा किंवा रूपक अलंकारांची छाया आहे; हा वर्णोच्चारगत उपमा किंवा रूपक अलंकार आहे; निदान त्या अलंकारांची त्यांत स्पष्ट वर्णोच्चारगत गर्भित सूचना आहे. आणि हेंही काव्याच्या व्यक्त स्वरूपाला, बाह्यांगाला फार साजतें, इतकेंच नव्हे तर कांहीं अंशीं अवश्यकहि आहे असें मला वाटतें; (४) आणि हा तात्विक युक्तिवाद सर्वस्वी सोडून देऊन ( सोडून देऊं नये, पण सोडून दिलाच तरी ) मराठी भाषेच्या मोडणीकडे, घाटणीकडे पाहिलें ( आणि आपण ह्या वेळीं निव्वळ मराठी भाषेंतील कवितेचाच विचार करीत आहोंत ) म्हणजे मला असें वाटतें कीं, इतर भाषांचें वाटेल तें असो, त्या भाषांच्या बाबतींत हा प्रश्न केवळ तात्विक दृष्टीनें एक वेळ सोडवितांहि येईल; पण मराठी ही भाषाच साद्यंत सयमक आहे. मुक्तेश्वरांच्या ओंव्यांपासून तों तुकाराममहाराजांच्या अभंगांपर्यंतच नव्हे, तर अगदीं सगनभाऊ आणि होनाजी बाळ यांच्या लावण्यापर्यंत ( पंतांच्या लहान म्हणतां येण्याजोग्या एकदोन कृती खेरीज करून ) मराठींतील सर्व कविता सयमक आहे ही गोष्ट तर निराळीच, पण मराठींतील सर्व म्हणी, बायकांचीं रिकामपणीं म्हणण्याचीं आणि तान्हुल्याला लाडवण्यासाठीं आणि " नीज " लावण्यासाठीं पाळण्याची दोरी हातांत घेऊन पेंगत पेंगत अव्यवस्थितपणें म्हणण्याचीं प्रेमरसानें ओथंबलेलीं गोड गाणीं, अडाण्यांच्या वेड्यावांकड्या लावण्या, नुसतें साधें " नांव " घेण्याचे उखाणे, जात्यावरच्या ओंव्या देखील, इतकेंच नव्हे तर " चांदोमामा चांदोमामा थकलास काय। निंबोणीच्या झाडाखालीं बसलास काय ॥ " किंवा " इकली मिकली। सोन्याची टिकली ! तान्ह्या बाळा टीट लावूं ॥ " वगैरे वगैरे निरर्थक वाटणारीं पण विलक्षण गोड अशीं आपल्या धाकट्या भावंडांना चांदण्यांत अंगणांत बसून किंवा घरांत दिव्यापाशीं बसून खेळवण्याचीं अगदीं लहान मुलांमुलींचीं गाणीं दुनियेच्या मराठी बोलणाऱ्या मुलखांत ऐकलीं म्हणजे खरोखर असें वाटतें कीं, ह्या महाराष्ट्रांतल्या तरुण

मातांनीं वडील माणसांना न दिसेल अशा रीतीनें सावधगिरीनें जेव्हां आपल्या तान्हुल्याचें चोरून पहिलें चुंबन घेतलें, तेव्हां त्या चुंबनाबरोबरच त्या माउलीनें ह्या महाराष्ट्रीय लोकांच्या तोंडांत यमक टाकून दिलें ! आणि म्हणूनच वर आतांच मीं म्हटलें आहें कीं, यमक ही मराठी भाषेंत तरी निदान नुसत्या तात्विक वादानें ग्रहण करण्याची किंवा झुगारून देण्याची गोष्ट नसून, तो मराठी भाषेच्या मोडणीचा, धाटणीचा एक महत्वाचा प्रश्न आहे. अन्तःकरणाच्या उद्वेगाला यमकादिकांचीं बंधनें खपत नाहींत; यमकानें कविता सुंदर दिसते, पण निर्यमक कविता अधिक गंभीर, सरळ व पाणीदार असते, वगैरे वगैरे बरेच आक्षेप यमकाविरुद्धहि आहेत हेंहि मला माहीत आहे, व ते सर्वच त्याज्य किंवा निरर्थक आहेत असेंहि मी म्हणत नाहीं. पण आज आपल्याला येथें यमकाच्या सर्वच साधकबाधक प्रमाणांचा सप्रमाण, सविस्तर विचार करावयाचा नसल्यामुळें ह्या आक्षेपांच्या तथ्यातथ्यतेचा मी येथें ऊहापोह करीत बसत नाहीं. पण वर मी जें काय लिहिलें आहे, त्यावरून मी यमकांना अनुकूल आहें, व कोणकोणत्या कारणांस्तव अनुकूल आहे, हीं दोन्ही वाचकांच्या स्पष्ट लक्षांत आलींच असतील असें मला वाटतें. यमकावरील एकच फक्त आक्षेप मात्र सर्वस्वी निरुत्तर करण्याजोगा आहे. व त्यापुढें यमकवाद्यांचा माझ्या मतें टिकाव लागत नाहीं. अर्थ आणि यमकसाधन यांचा जर एकादे जागीं लढा पडला, तर आपण कोणाचा पाठपुरावा करावा, असा आक्षेपकांचा प्रश्न आहे, व माझ्या मतें अशा ठिकाणीं यमकाला खुशाल दगा देऊन अर्थाच्या पक्षाला जाऊन मिळणाऱ्या खऱ्या यमकभक्ताला देखील आपल्या कृत्याबद्दल कोणत्याहि प्रकारें लाज वाटण्याचें कारण नाहीं, अगर अशी ज्यास अडचण कधीं उद्भवते तो कवीच नव्हे, असें म्हणणाऱ्यांच्या म्हणण्यांतहि मला तिळमात्र तथ्य दिसत नाहीं. व असें आहे म्हणूनच मी यमकपक्षीय असूनहि यमकच आपलें ध्येय समजून मुद्दाम लांबलांब यमकें साधण्याचा अट्टाहास मुळींच केलेला नाहीं; किंबहुना त्र्यक्षरी किंवा द्व्यक्षरी देखील यमकें माझ्या ह्या काव्यांत कमीच सांपडतील. पुष्कळ वेळां मी एकाक्षरी यमकच केलें आहे, सद्दशाक्षरी यमकहि कांहीं कमी वेळ केलेलें

नाहीं, आणि कांहीं ठिकाणीं तर मीं निव्वळ स्वरान्त यमकच मुद्दाम होऊं दिलें आहे, व यमकवादी असूनहि हीं सर्व यमकें अत्यंत समाधान चित्तानें मी आहेत अशींच ठेवीत आहें. असो.

संस्कृताच्या नियमाप्रमाणें पाहिलें असतां केव्हांहि व कोठेंहि पुढें जोडाक्षर आलें कीं, मागल्या अक्षराच्या दोन मात्रा मानिल्याच पाहिजेत, व त्याप्रमाणें तें अक्षर उच्चारिलेंहि पाहिजे. प्रमाण मानल्या गेलेल्या बहुतेक जुन्या मराठी कवींनीं हा नियम बहुतांशीं पाळिलाहि आहे. पण निव्वळ मराठीच्या स्वतःच्या धाटणीकडे पाहिलें, तर मराठी भाषेला स्वतःपुरता तरी हा नियम मुळींच कबूल नाहीं, असें म्हटलें असतां चूक होणार नाहीं. उदाहरणार्थ, पहिल्या, चवथ्या, पडद्यामागें, गुढ्यातोरणें, खाण्यापिण्याचें, फिरक्याचें मळसूत्र, गड्याचा पगार, किंवा गड्या हें संबोधन, वगैरे वगैरे सारखे असंख्य शुद्ध मराठी शब्द व मराठी प्रयोग काढून दाखवितां येतील, व ह्यांपैकीं एकाहि ठिकाणीं आपण कधींहि मागल्या अक्षराच्या दोन मात्रा मानिल्याप्रमाणें जोर देऊन पहिल्ल्या, चवथ्थ्या, पडद्द्यामागें, गुढ्ढ्यातोरणें, खाण्ण्यापिण्ण्याचें, फिरक्क्याचें मळसूत्र, गड्ड्याचा पगार, किंवा संबोधनार्थी गड्ड्या, असा उच्चार करीत नाहीं. इतकेंच नव्हे तर 'मुंबईंत व पुण्यांत भेद काय?' व 'पापपुण्यांत भेद काय?' किंवा 'तिच्या लावण्यांत एक प्रकारचा मोहकपणा आहे' व 'राम-जोश्यांच्या लावण्यांत एक प्रकारचा मोहकपणा आहे' वगैरेसारख्या ठिकाणीं जेथें एक संस्कृत व एक मराठी शब्द हे अगदीं सारखे असतात व सारखेच लिहिलेहि जातात; तेथें देखील मराठी शब्द आपण जोडा-क्षरानें दीर्घ न करतांना साधा उच्चारितों व संस्कृत शब्द मात्र संस्कृताच्या नियमाप्रमाणें द्वित्त करून म्हणतों. अशा परिस्थितींत मराठी कवितेंतहि प्रत्येक ठिकाणीं पुढें जोडाक्षर येईल तेथें तेथें मागलें अक्षर द्वित्त किंवा दीर्घ मानलेंच पाहिजे असें म्हणणें अशक्य आहे, आणि असा हट्ट घेऊन बसणें हें माझ्या मतें धाष्टर्य आहे. पण म्हणून संस्कृत शब्दांचे बाबतींत संस्कृताचा कोणताहि नियम मोडण्याचा अगर बदलण्याचा आपल्याला अधिकार नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्या ठिकाणीं संस्कृत व्याकरणाला

सोडून केलेले प्रयोगच चूक आहेत, हेंहि मला कबूल आहे. आणि असें आहे म्हणूनच मी शुद्ध संस्कृत शब्दांचा समास केला असतांना जोडाक्षरानें मागलें अक्षर नेहमीं दीर्घ मानिलें आहे. पण ज्या ठिकाणीं सुटे संस्कृत शब्द मराठींत उसने घेऊन वापरतांना योगायोगानें एकामेकांपुढें आले आहेत त्या ठिकाणीं देखील त्यांना मराठीप्रमाणेंच लेखून त्यांतील जोडाक्षरांनीं मागलीं अक्षरें दीर्घ मानिलेलीं नाहींत; व अशा रीतीनें कांहीं लोकांना कदाचित् जरासा अप्रिय वाटेल असा संस्कृत-मराठीचा मीं ह्या बाबतींत समेट केला आहे. संस्कृत शब्दापुढें शुद्ध संस्कृत शब्द आला आहे तेथेंहि जर मी मागल्या अक्षराच्या दोन मात्रा मानण्याचा नियम मराठीच्या घाटणीला अनुसरून पाळिलेला नाहीं, तर मराठी शब्दापुढें संस्कृत शब्द आला अगर संस्कृत शब्दापुढें मराठी शब्द आला तर तेथें तेथेंहि मी तो पाळलेला नाहीं हें वेगळें सांगणें नकोच. पण कोठेंहि काय, समेट हा दोनही पक्षांना प्रिय असण्याऐवजीं बहुधा दोनही पक्षांना थोडाबहुत तरी तो अप्रियच असतो, व हाहि समेट बहुधा तसाच ठरेल असा माझा अजमास आहे.

आतां कथानकाविषयीं. कथानक प्रस्तुत काव्याला आहे म्हटलें तर आहे आणि नाहीं म्हटलें तर नाहीं. कथानकाच्या बाबतीपुरती प्रस्तुत काव्याची " मेघदूता "सारखी कांहींशी दशा आहे. एकपात्री नाटकाप्रमाणें बऱ्याच अंशीं एकपात्री अशा ह्या काव्याला नायकाशिवाय उपनायक, नायिका, उपनायिका, कांहींहि नाहीं. पण कथानकासाठीं हें काव्य लिहिलेलेंहि नाहीं. पांचव्या प्रकरणाच्या शेवटापर्यंत ह्या खंडांत जेथपर्यंत हकीकत सांगून झाली आहे, त्याच्यापुढें काय काय झालें, नायक कोठें गेला, त्याला आणखी काय झालें, व हें काव्य कोठें संपेल, हें वाचकांना ह्या प्रथम खंडाच्या प्रस्तावनेंतच सांगून ठेवावें असा प्रथम माझा विचार होता. पण मागाहून मीं तो रहित केला आहे. आतां प्रसिद्ध होत आहे हा ह्या काव्याचा भाग जर वाचकांना आवडला तर ते दुसरा लिहून प्रसिद्ध झाल्यावर घेऊन वाचतीलच; आणि ज्याला हेंच आवडणार नाहीं, त्याला उगीच कथानकच तरी तेवढें ऐकून काय करावयाचें आहे ?

असो. प्रस्तावनेदाखल येवढेच चार शब्द मला माझ्या वाचकांना सांगावयाचे होते. प्रस्तावना थोडी लांबली ह्याबद्दल वाचकांची क्षमा असावी.

प्रस्तुत काव्य छापून काढतांना त्याच्याचबरोबर माझ्या इतरहि कांहीं थोड्या लहान कविता ह्या पुस्तकाच्या शेवटीं दिल्या आहेत.

प्रस्तुत पुस्तक चांगलें छापून दिल्याबद्दल मी चित्रशाळेच्या मालकांचा ऋणी आहें. तसेंच प्रुफें तपासण्याच्या कामीं अत्यंत मेहनत घेऊन, पुस्तकाविषयीं माझेशीं सारखा पत्रव्यवहार करून व त्याच्या छपाईकडे वगैरे सर्वच तऱ्हेनें लक्ष ठेवून माझे मित्र श्रीयुत रा. रा. स. **पिंपुटकर**, संपादक—"**आत्मोद्धार**" पुणें, ह्यांनीं मला उपकृत करून ठेविलें आहे.

अमरावती—वऱ्हाड. } बळवंत गणेश खापर्डे.

# समर्पण

आहे दुस्सह दुःख दीन जगिं या सारीकडे कोंदलें ।
दुःखें जाचुनि हीन दीन जगता उष्णाश्रुनें न्हाणिलें ॥
भाजोनी हृदयें, छळोनि मनही, देहासिही जाळिलें ।
रूपें घेउनिया अनेक, जगता दुःखें अती गांजिलें ॥१॥

येत्रोनी जगतास पूर्णपण जैं जाईल, जावो लया ।
आहे तोंवरि दुःख खास जगतीं यातें रडों लावण्या ॥
ऐशा जंन्मुनि अश्रुपूर्ण जगतीं, अश्रूंत पोहूनिया ।
कीजे यत्न असाचि कीं, जगिं कमी हो अश्रुधाराहि या ॥२॥

कर्तव्या स्मरुनि मनीं म्हणुनि मीं वाग्यज्ञ हा साधिला ।
आहे अल्प अती, मतीहि परी ती अत्यल्प माझी, तिला— ॥
तोलेसा करिं यत्न, हेतु मनिंचा थोडाहि साधावया ।
एका निःश्वसनासि एकहि तरी अश्रूसि रोधावया ॥३॥

केलें हें इतुकें कुठें तरि कधीं यानें जरी एकदां ।
माझ्या सर्व श्रमासि पूर्ण तरि तें साफल्य आलें तदा ॥

---

१, ह्याचा कर्ता ' दुःख.'

दुःखा शत्रु म्हणोनि ही कृति करी, दुःखार्थ ती राखितों ।
त्याशीं हे झगडो म्हणोनि

कृति ही
दुःखासि मी अर्पितों ॥४॥

होवो कांहिंहि शेवटीं, रणिं तरो किंवा हरो वा मरो ।
माझें काव्य परी अखेरवरि हें दुःखासि युद्धा करो ! ॥
आहे येवढि आस फक्त हृदयीं याचेविशीं माझिया ।
हे कृष्णा ! करुणाघना ! पुरवि ती दासासि तोषावया ॥५॥

हे काव्या ! मम बालका ! हृदयिं या पाषाणता आणितों ।
मृत्यूला नचिकेत, तेविं तुज मी दुःखासि गा आर्पितों ! ॥
बा रे ! दुष्कर युद्ध; तूंहि कवळे; दुर्दान्त शत्रूहि तो ।
कर्तव्या स्मरुनी परी तुजासि मी दुःखासि गा अर्पितों ॥६॥

देतों बाल ! निरोप; जा जगिं अतां; साधे तसा तूं लढे ।
ज्यानें पाठविलें तुला, हृदय हें रोधोनि, युद्धीं पुढें – ॥
त्याचें नांव नकोस घालवुं तुला हें शेवटीं सांगतां ।
कष्टानें फिरतों अतां परत मी; भेटूं पुन्हा ! ये अतां ! ॥७॥

श्री.

# काव्यकान्तार

## पूर्वखंड

भारत ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १८५
(स्थळ प्रत)

### प्रकरण पहिलें

### गमनसंकेत

मीं काव्यकान्तारिं कधीं रिघोनी ।
केली न केली मन रंगवोनी ॥
पुष्पावतंसें नटल्या लतांतें ।
झालों न मी स्पर्शुनि धन्य हातें ॥ १ ॥

वाग्देवि डोले वचनें जयांच्या ।
आले सुखा भोगुनि त्या वनींच्या ॥
ते वर्णिती मौज विलास नाना ।
तेथें न जातां म्हणती कळेना ॥ २ ॥

त्यांनीं इथें काननिं या रमोनी ।
जीं गोड पुष्पें अणिलीं जपोनी ॥
सौंदर्य त्यांचें, विविधत्व, गोडी ।
पाहोनि हें चित्त ठिकाण सोडी ॥ ३ ॥

अहा कसा रंग! कशी बहारी ! ।
मृदुत्व कीं ठेवणिची खुमारी ॥
ह्या कोण सौंदर्य म्हणे विचारी ! ।
ही मूर्त वाटे मज चित्तचोरी ॥ ४ ॥

अहा कशी मोहिनि यांनिं घातली ।
कळे न जादू कशिकाय जाहली ॥
भ्रमूनि मोहूनि भुलूनि सोडिलें ।
मला तयांनीं निज छंदिं लाविलें ॥ ५ ॥

गमे जिथें नेतिल तेथ जावें ।
जरी 'बसे' बोलति, दंग व्हावें ॥
रमोनि हर्षें शिर डोलवावें ।
पदाब्जि या लीन सदा असावें ॥ ६ ॥

वेडें करोनी, मम चित्त मोहुनी ।
"नेऊं" म्हणीती "तुज काव्यकाननीं" ॥
या पुष्पि ना गोंडस रम्य पाकळ्या ।
काव्यप्रभेच्या सुभगाहि सांखळ्या ॥ ७ ॥

नेती मला बंदि करोनि चित्तीं ।
तरी न माझ्या मनिं लेश भीती ॥
सौख्या नको कोण म्हणे अभागी ।
चला रमूं काव्यमनोज्ञरंगीं ॥ ८ ॥

हंसूं तिथें मौजहि खूप पाहूं ।
रमूं जरा मंजुल गान गाऊं ॥
सुखांत नानापरि काळ नेऊं ।
चला चला काव्यवनांत जाऊं ॥ ९ ॥

अतां न हा हर्ष मनांत मावे ।
तिथें अतां काय रितीं रमावें ? ॥
नितांत स्वानंदिं किती फुलावें ? ।
अहा ! नसे अंत ! किती रमावें ! ॥ १० ॥

कैसा सुधेचा अति गोड प्याला ।
यांनीं कृपेनें मज पाजियेला ॥
पुष्पांगनांनो ! स्तवुं केवि तुम्हां ? ।
वंदी सख्यांनो, पदपंकजांना ॥ ११ ॥

हे काव्यकान्ताराविहारिणींनो ! ॥
दिव्यप्रभांगी मनमोहिनींनो ! ॥
आनंदरंगांकित चंद्रिकांनो ! ।
श्रीशारदासुस्मितबालिकांनो ! ॥ १२ ॥

वंदी असा अंकित वंदि तुम्हां ।
न्या न्या मला काननिं न्या चळाना ॥
थांबा परी एकचि प्रार्थना गे ।
ही याचना हा नव भक्त मागे ॥ १३ ॥

येतों तुम्हांसंगति फार मोदें ।
नका त्यजूं या परि मार्गिं कोठें ॥
नेतां परागां हृदयीं जपोनी ।
तसें मला न्या हळुं सांवरोनी ॥ १४ ॥

तुम्ही मला वंद्य; परी जयांनीं ।
तुम्हां जगीं आणियलें सजोनी ॥
त्या मार्मिकांना कविपुंगवांना ।
वंदूं तरी केंवि मला कळेना ॥ १५ ॥

अशा जनीं जो पथ आक्रमीला ।
त्या मार्गिं जातां मन घे भयाला ॥
हळू गड्यांनो, म्हणुनी जपोनी ।
न्या गे सख्यांना, मज काव्यकाननीं ॥ १६ ॥

## प्रकरण दुसरें

# प्रवास

विनंति मम मानली, मनिं प्रसन्न झाल्या सती ।
"नको तुजसि भीति ही" सदय त्या मला सांगती ॥
"मधें न तुज टाकुं हो ! भिउं नको; उठ ! जाउं या ।
चला" म्हणति त्या परस्पर सख्या "चला नेउं यो" ॥ १ ॥

कुणी पदर खोंविते, वसन सांवरी अन्य ती ।
स्वकंठगत भूषणा करित नीट कोणी सती ॥
कुणी त्वरित वाकुनी रमणि सारिते नूपुरा ।
प्रवास करण्या अशा त्वरित सिद्ध त्या सुंदरा ॥ २ ॥

सती मजसभोंवतीं गुणवती उभ्या राहिल्या ।
घनाभंवतिं तारका जणुं तशा दिसों लागल्या ॥
हळूंच मज तोलुनी बघुनि त्या जरा हांसल्या ।
मला गगनिं न्यावया सजणि सिद्ध तैं जाहल्या ॥ ३ ॥

---

१ याला.

वसंतसमयीं जशा विविध रम्य शोभांगना ।
धना हरिति मोहुनी, मनहि त्यांविणें राहिना ॥
तशा मजासि मोहिनी अति सुखांत नेती पहा ! ।
फुलांवरि निजें सुखें अमित सौख्य आहे अहा ! ॥ ४ ॥

किती सुखद स्पर्श तो ! मज न वर्णवे माधुरी ।
सुखें नयन झांकिले — अमृतधार वर्षे वरी ! ॥
क्षणैक सुखसागरीं विकल काव्यकान्तारही ।
अहा ! विसरलों पहा ! वदुं कशी अतां मौज ही ! ॥ ५ ॥

फुलांसि कमलांसि जो हळुंच छेडुनी धावतो ।
परागहर चोर तो रमत मंदसा वाहतो ॥
सखीसुतनुगंधही करि कमालिचा रंग तो ।
जिवा अगइ मोहितो ! गगन सौरभें कोंदितो ! ॥ ६ ॥

नितांत सुखशांति ही गगनिं जी इथें नांदते ।
तिनें सकल मोहुनी गमत विश्व केलें रितें ॥
न नाद मुळिंही, गमे सकल शांत हें शून्यसें ! ।
अहा मधुर नाद हा मधुनि राहुनी येतसे ! ॥ ७ ॥

पथीं सजणि ती कुणी सहज गातसे मोहिनी ।
मनांत हळुं गुंजते अमित गोड मंजुस्वनीं ॥
इथें नाभि नसे कुठें पिक म्हणोनिया काय ते ।
अलाप नच चोरितो कुणिहि पाहुनी गात तें ॥ ८ ॥

दुजी कुणि पदा जयीं सहज हालवीते सती ।
करोनि मृदु झंकृती हळुंच नूपुरें वाजतीं ॥
मला भ्रमविमूढतेमधिं गमे असें कायसें ।
गमे सुचतुरा जणूं समचि काय कीं देतसे ॥ ९ ॥

कुठें सुबक पाकळी पडत उष्ण गंडस्थलीं ।
तिथें पवनसंगमें हळुं हळूं हलों लागली ॥
गमे सदय माउली मजसि प्रीतिनें थोपिते ।
'करी शयन बालका' म्हणुनि प्रेमला बोलते ॥ १० ॥

अनंतपरिं यापरी रमत शांत वेळीं अशा ।
सुगंधमय मंदशा पवनसंगमें भ्रांतसा ॥
सुरम्यकलिकानितांतमृदुपुष्पशय्येवरी ।
अहा पडुनि धन्य मी गगनिं हा प्रवासा करी ! ॥ ११ ॥

सुखी नर, जयास हा परमलाभ झाला असे ।
असे अति सुदैवि मी मजासि धन्य वाटे असें ॥
अशा समयिं हा अकल्पित विघात आला पहा ।
कळे न मज हाय हो परि विघात नोहेचि हा ॥ १२ ॥

हळूं हळुं कमी कमी गमत होत आहे गती ।
सरोवरतटीं जशा लहरि, त्या तशा थांबती ॥
जशा लहरि त्यापरी मग उसासही टाकिती ।
लता पवनकंपिता ध्वनि तसा सख्या काढिती ॥ १३ ॥

परी मजासि पाहुनी अजुनि सुप्तसा सुंदरी ।
प्रभातपिक गात तो मजसि जागवी त्यापरी ॥
"अये निजसि कां" म्हणे "अजुनि बा ! उठें लौकरी ! ।
अतां नयनिं ही पहा ! नविन भू किती सांजिरी ! ॥१४॥

पहा दिसत हें कसें मदन सृष्टि व्हावा तसें ।
अतां उठ ! नको निजूं ! उघडिं नेत्र पाहूं कसे ! ॥
पहा उठ गडे अतां ! बघ कसें दिसे सर्व हें ! ।
अहो कुणि नवा विधी कुशलसा रची काय हें !" ॥ १५ ॥

असें म्हणुनि ती मला उठविण्या प्रयत्ना करी ।
हळू मजासि हालवी सुतनु स्कंधदेशावरी ॥
दुजा कमलहस्त तो फिरवि मस्तकीं गोजिरी ।
फसे खचित भोळि ही ! उलट साधनांतें करी ! ॥ १६ ॥

कधीं तरि पिकस्वरें कुणिहि त्रासला काय हो ? ।
कधीं तरि सुधांशुनें कुणिहि जागला काय हो ॥
उठेल कधिं बालका जरिहि माउली गोंजरी ? ।
असें असुनि ही मला उठवि ! तन्वि भोळी खरी ! ॥१७॥

अहो वदुं कसें अतां ! मजासि लाज भारी गमे ।
तसाचि निजलों पहा कळुनि योग्य कीं जागणें ॥
मला नच मुळीं तदा परमसौख्य तें सोडवे ।
मधें सुख मिळे तरी मग न साध्य तें आठवे ! ॥१८॥

तिचें मन, मला असा बघुनि, फारसें घाबरें।
करें तरणिच्या जणूं मृदुल पुष्प कोमेजलें ॥
वदे, "उठत कां न हा? आणि सखे पहा गे पहा! ।
कसें अगइ मी करूं; उठविं गे पहा गे पहा! ॥ १९ ॥

अहो खचित मूर्ख मी; उगिच माउली पीडिली! ।
न दोष सतिचा; असे मधुर किंकिणी चांगली ॥
परी न चतुरा करीं म्हणुनि बेसुरी वाजली ।
नको इजासि गांजणें, मजसि बुद्धि झाली भली! ॥ २० ॥

तया क्षणिं झणीं जणूं हृदयिं कांहिंसें टोंचलें ।
असें मजसि होउनी उघडिं नेत्र मी आपुले ॥
अहा मजसभोंवतीं गुणवती पुन्हा पाहिल्या! ।
घनाभंवतिं तारका जणुं तशा दिसों लागल्या! ॥ २१ ॥

हळूं बघत भोंवती — कमलिनी सख्या भासल्या ।
प्रभात मम जागृती उगवतां फुलों लागल्या ॥
हळूंच मज ठेवुनी सुदति त्या जरा हांसल्या ।
मला गगनिं आणुनी सजणि श्रांतशा भासल्या ॥२२॥

परस्पर बघोनियां स्मितमुखी मनीं तोषल्या ।
अगम्य मजला असें मधुर काहिंसें बोलल्या ॥
अती मृदुल गौरशा चरणिं चालल्या त्या जयीं ।
सख्या मिसळुनी गमे कुसुमगुच्छ झाला तयीं ॥ २३ ॥

शिरोगत भुजंगिणीप्रति मृदू फुलें वाहिलीं ।
अतां विखुरलीं, न तीं सरल कुंतलीं राहिलीं ॥
म्हणोनि सखिला कुणी सजणि 'येइं गे' बाहती ।
सलील सुमनें शिरीं करुनि नीट त्या मागिती ॥२४॥

धरोनि कर वारिजें हनुसि तेविं शीर्षाप्रति ।
सहास रमणी किती दुखत मान ती मोडिती ॥
क्षणैक रमती अशा दिसति त्या शुभांगी तिथें ।
अदृश्य मग जाहल्या, कळत नाहिं गेल्या कुठें ! ॥२५॥

## प्रकरण तिसरें

# भ्रम

असा भ्रमर मी, जणूं रजनिकालिं जो कोंडिती ।
सख्या कमलपाकळ्या उमलतां अतां सोडिती ॥
सख्या मजसि सोडिती, नयनही न मीं झांकिले ।
परी कळत कां न हो ? मजसि काय हें जाहलें ? ॥१॥

दिसे मजसि सर्व हें; खचित मी पहा पाहतों ।
असे बहुत रम्य हें, बघुनि हर्षही पावतों ॥
कळे न मज कां परी ? सकल स्वप्नसें भासतें ।
पथीं विसरुनी कुठे उमग राहिली वाटतें ! ॥ २ ॥

असा प्रणव ऐकुं ये, कळत 'ब्रह्म' हा अर्थही ।
परी न मुळिं "जाणवे" हृदयिं ना पटे कांहिंही ॥
तसेंचि सकलेंद्रियां जगत सर्वही हें कळे ।
परी न "अनुभूति" ही मजसि वस्तु कांहीं मिळे ॥ ३ ॥

दिसे, मजसि भासतें खचित काय हो वारि हें ? ।
म्हणों नभ जरी तरी लहरिही मला भासते ! ॥
म्हणों जल तरी इथें मधुनि तारका हांसते ! ।
म्हणों भ्रम तरी कसा ? मजसि वाटतें दीसतें ! ॥ ४ ॥

इथें कमलिनी, तिथें कमलिनी ! कुणा पाहुं मी ? ।
हले कमलिनी, उभी कमलिनी ! कुणा पाहुं मी ? ॥
जलीं कमलिनी, स्थलीं कमलिनी ! कुणा पाहुं मी ? ।
अयी कमलवासिनी कमलिनी ! कुणा पाहुं मी ? ॥ ५ ॥

नभीं विमल चांदणी – जलिं इथें दिसे चादणी ! ।
नभीं उभिच चांदणी – हलत चांदणी ही क्षणीं ! ॥
अहो नवल ! चांदणी कमल झेलिसें पाहिं मी ।
विहार करि चांदणी जलिं ! कसें खरें मानुं मी ? ॥ ६ ॥

न केवलचि चांदणी – अगइ ! चंद्रही काय हा ? ।
परी हरिण नाहिं कीं ! म्हणुं कसा बळें चंद्र हा ? ॥
नसेल जरि चंद्र हा, तरि अशी प्रभा ही कशी ? ।
असेल जरि सूर्य हा किरणिं ही सुधा कां अशी ? ॥ ७ ॥

असो खचित कोणिही परि पहा प्रभा हे किती ! ।
कशी अतुल दिव्यही, विमल, शांत; मोही मती ! ॥
अहो भ्रम परी कशा ? खचित चंद्र आहेच हा ।
कळे न मज चंद्र का ? खचित चंद्र हा, चंद्र हा ! ॥ ८ ॥

अये रजनिकान्त रे ! पळुनि येथ आला कुठें ? ।
मृगांक म्हणती तुला, हरिण काय झालें तुझें ? ॥
कलंक कधिं टाकिला ? तुजसि कोण आणी इथें ? ।
कठोर ! रजनी सती विरहिं लोटिली काय ते ? ॥ ९ ॥

तुला निज कला जगीं छळिति त्यास तूं त्रासला ।
कलंकहि कलाहि त्या म्हणुनि काय तूं टाकिल्या ? ॥
प्रिया रजनि टाकुनी परि सुखी कसा जाहला ? ।
नको जग तुला ? अम्हां त्यजुनि कां गड्या चालला ? ॥१०॥

तुला विरहि निंदिती म्हणुनि काय रागावला ? ।
उणें तुजसि बोलली रजनि काय ?–सांगें मला ॥
कुणी वदन चंद्र तूं जगति वा असा पाहिला ।
जया बघुनि लाजुनी लपुनि येथ तूं राहिला ? ॥ ११ ॥

जया जगिं नसे शशी, जगुनि त्या जगीं काय हो ! ।
नसे शशि असें हरी ! जगतिं हें कधींही न हो ! ॥
तुझेविण करील तें जगत काय आक्रांत रे ? ।
सहल जगना कशी अवस नित्य सांगें बरें ? ॥ १२ ॥

स्तवी न कुणिही कवी म्हणुनि काय कंटाळला ? ।
अतां चल जगीं पहा स्तविन मी कवीसा तुला ॥
अहो, स्मरण हें मला सहज फार झालें भलें ।
न तें अजुनि काव्यकानन मला कसें दीसलें ? ॥ १३ ॥

" तुला कवि करूं " असे सुदतिंनीं मला सांगुनी ।
जगामधु न आणिती म्हणाति नेउं तूतें वनीं ॥
अतां त्याजिति हा इथें, 'वन' न तें कुठें दीसतें ।
कुठें त्याजिति हो मला ? मजसि भ्रांतसें वाटतें ॥ १४ ॥

नभीं कमल नाहिं हो ! नच जलीं कधीं चांदणी ।
इथें कमलिनींसवें विमल चांदण्या मैत्रिणी ! ॥
अहो नवल जास्तही – धवलचंद्रही हा पहा ।
बसोचि कमलासनी, नटत जेविं पद्माच हा ॥ १५ ॥

अहो समजलें ! मला समजलें अतां काय तें ।
किती खचित मंद मी, समजलें असे काय तें ! ॥
निशाप्रिय अशामुळें पळुनि काय आला इथें ! ।
अहा गगनभूषणा ! तुजसि शोभतें काय तें ? ॥ १६ ॥

तुझी रजनिही तशी कुमुदिनी प्रिया ऐकिली ।
परी कपटबुद्धि ही तुजसि केवि रे जाहली ? ॥
कठोर ! रजनी तुवां खचित वाटतें टाकिली ।
शशी म्हणुं तुला – असो कटुवचोक्ति नाहीं भली ॥१७॥

न लाज तुज वाटली गरिब यामिनी टाकिली ।
स्वतां जलसुता प्रिया वरुनि मौज ही मांडिली ॥
अशी नवसखी तुझी बहुत काय रे चांगली ? ।
सुशील, सरला सती रजनि बापुडी टाकिली ! ॥१८॥

जगीं कुमुदिनी निशा उभयतां सुखें नांदती ।
तुझी नव सखी न कां तुजसवें जगीं राहती ॥
विलास नवरीतिचा वरुनि दोन या नायका ।
निशा विरहिं टाकुनी पळुनि येथ आलास कां ? ॥ १९ ॥

अहो उमगलें ! असेंहि बहुतांपरी संभवे ।
गमे कुमुदिनी ! तुझें असत खास माहेर हें ॥
म्हणोनि क्षणिकास या पतिस तूं इथें आणिलें ।
निशाभय असें शशी वश असावया टाळिलें ॥ २० ॥

खुळ्या युवति तारका ! स्वपति या शठा मानिती ।
स्मरोनि पतिभक्ति त्या शशिसवें नभा त्यागिती ॥
म्हणोनिच गमे इथें नलिनि चांदण्या मैत्रिणी ! ।
न चंद्र नच तारका – जगत आणवे ना मनीं ! ॥ २१ ॥

अतां समजलें मला खचित लोक हा कोणता ।
निवास करितो इथें नलिनिसुंदरींचा पिता ॥
अशी अतुल रम्यता सजत इंदुचे सासरीं ।
दुजे स्थलिं कुठें अशी बहर ही असावी तरी ! ॥ २२ ॥

मला नवल वाटलें, रजनि तूं कशी सोडिली ? ।
कळे कपट हें अतां; तुज सखी दुजी लाधली ! ॥
सुदैव दुजिचें अतां उगवलें – तुला मानली ।
अहा ! रजनि देवि गे ! सवत ही तुला भोंवली ! ॥२३॥

इनें फसविला शशी "कुमुदिनी ! अये निर्घृणे ।
तुला मजसि सांग गे जगतिं काय होतें उणें ? ॥
कशास शशिला इथें भुलवुनी तुवां आणिलें ? ।
जगास रजनीसही रडविलें तुवां गे खले ! ॥ २४ ॥

अशी कठिणमानसा, शशि ! तुला सखी मानली ।
दयाळ प्रणयी जनां रसिक ती निशा टाकिली ! ॥
विरामजननी जगा, श्रमलिया जनां साउली ।
सुधाचि वसुधातलीं ! रजनि धन्य ती माउली ! ॥२५॥

तुझी हृदयजाणवी रासिकता कुठें लोपली ? ।
मतीसहित दृष्टिही तव विलाश का पावली ? ॥
पहा, शशि ! पहा तरी ! रसिकता कुठें जाळिली ! ।
शशी म्हणुं तुला कसें ? हरि ! कमाल ही जाहली ! ॥२६॥

निशारमणि सांवळी म्हणुनि काय तूं टाकिली ? ।
शठा शशि ! पहा तुझी नवसखी पहा चांगली ॥
जगद्रजनिसज्जनां छळुनि अंतरीं पेटली ।
जळोनि सुमती, हिला हृदयिं लागली काजळी ! ॥ २७

निशा प्रणय जोडिते, कमलिनी तया तोडिते ।
अतां मजसि सांग गा, उचित यामधें कोणतें ? ॥
जिनें प्रणय भंगिला शशि ! तुझा दुजीचे सवें ।
अशी प्रणय ही स्वतां करिल हें कसें संभवे ? ॥ २८ ॥

अशी रमणि ज्या रुचे मज असा शशीही नको ! ।
कठोरहृदया अशी नलिनि पाहणेंही नको ! ॥
दयार्द्र मज माउली रजनि आठवे हो सती ।
गमे तिजसि भेटुनी त्वरित शांतवावीच ती ॥ २९ ॥

अहो, परि मला अतां रजनि कोठुनी भेटते ? ।
सती जगतिं राहिली; जगहि राहिलें मागुतें ! ॥
जगासि मुकलों फुका, मज न काव्यकान्तारही ! ।
अहो ठगविलें मला ! खचित सिद्ध हो गोष्ट ही ! ॥३०।

निघें कवण हेतुनें ? मधिच काय हें जाहलें ! ।
कुठें सुख वनांतलें ! मजसि कष्ट हे लाधले ! ॥
निघें त्यजुनि मूर्ख मी जग सुखाभिलाषें जरी ।
अभागि नित तो अभागि; सुख केविं लाभे तरी ! ॥३१॥

म्हणों तरि असें कसें ? मजसि जें असें भासतें ।
असेल वन हेंचि हो, म्हणति काव्यकान्तार तें ! ॥
वनापरिस एक ती खचित गोष्ट येथें असे ।
विहंगसुखकूजनापरिस ऐकुं ये कांहिंसें ॥ ३२ ॥

अहो परि पिकापरी सजणि मार्गिं ती गाइली ।
असोनि मज माहिती मजसि कोकिळा भासली ! ॥
अतां बहुत कूजनापरिस ऐकिलेंही जरी ।
परी पुनरपी कसा भरंवसा बसावा तरी ! ॥ ३३ ॥

कळे न मज कांहिं हें, गमत संभ्रमाचे परी ।
मती खचित कुंठली, करुं कसें अहा रे हरी ! ॥
कुणासि 'मज साह्य द्या' म्हणुं तरी ? करूं मी कसें ? ।
इथें कुणिहि नाहिं का मजसि साह्य देईलसें ? ॥ ॥ ३४ ॥

दुजा न कुणिही सखा, परिचयीहि नाहीं कुणी ।
शशांक मज एकला दिसत पाहिलेला जनीं ॥
अहो, गरज आपणा, शशिविणें गती अन्य ना ।
उपाय नसतां दुजा खलजनाप्रती प्रार्थना ! ॥ ३५ ॥

" अये रजनिमोहना ! " अगइ ! मी म्हणें हें कुणा ? ।
" क्षमा करिं शशी ! अगा कुमुदिनीमनोनन्दना ! ॥
तुला शरण मी शशांक ! मज संकटीं तारिं या ।
स्मरोनि मम चंद्रिकाप्रिय मना करीं गा दया ॥ ३६ ॥

जगासि मुकलों उगाचि, शशि ! मी अभागी किती ! ।
न काव्यवनिं पोंचलों ! मजासि त्या इथें टाकिती ॥
इथें मजसि कांहिं ना मुळिंच कीं अभाग्या कळे ! ।
अतां शरण जावया चरण कोणते राहिले ? ॥ ३७ ॥

जरी जगतही मुकें, वनहि तें मुकें पूर्णसें ।
इथेंहि न कळे तरी पुढति होइ माझें कसें ? ॥
कुठें पडत येउनी ? मज न येथ कांहीं कळे ।
अतां शरण जावया चरण कोणि ना राहिले ॥ ३८ ॥

जगत्स्मृतिविना अतां सुख दुजें कुठेंही नसे ।
तुला बघुनियां जगत्स्मृति तरी मला होतसे ! ॥
म्हणोनि गमतोसि तूं मजासि सौख्यसर्वस्वसें ।
शशी ! प्रिय किती मला गमसि आज सांगूं कसें !॥३९॥

अतां दुजि मला कुठें किमपिही न आशा दिसे ।
जगत्स्मरण येवढा मजसि सौख्यतंतू असे ॥
अलभ्य म्हणुनी जरी स्मरण तें अती ताप दे ।
जगत्स्मरण तें तरी मजसि येवढें राहुं दे ! ॥ ४० ॥

पुन्हां स्मरुनियां पिता, जननि तेविं ती अंतरीं ।
मला मन भरोनियां शशि ! सुखें रडों दे तरी ! ॥
जरी हृदय कांपुनी मज उमोप आणी रडें ।
जगत्स्मरण तें तरी मजसि राहुं दे तेवढें ! ॥ ४१ ॥

नसे मजसि जागृती, मज नसेचि ही झोंपही ।
नसे शशि सख्या ! मला, बघ नसे अतां स्वप्नही ! ॥
न जागृतिहि, झोंपही, नच जरी मला स्वप्नही ।
शशी ! मज कळे न रे, म्हणुं स्वतांसि वेडा तरी ॥ ४२ ॥

नको मजसि वेड हें ! मजसि दे जगज्जागृती ।
जिथें मम सखे, तसे सकल आप्तही राहती ॥
जिथें सकलपावना धवलनीर गंगा नदी ।
जिथें नग हिमाचलापरि नभा सुखें भेदिती ! ॥ ४३ ॥

पुन्हां जग मला प्रकाशमय चक्षुनें तें दिसो ।
पुन्हां मजसि दुर्धरप्रियवियोग केव्हां नसो ॥
नको मजसि वेड हें, मजसि दे जगज्जागृती ।
सुरम्य वनही नको ! मजसि दे जगज्जागृती ! ॥ ४४ ॥

अयी ! खचित काय मी, खचित काय वेडा असें ? ।
असेन जरि भ्रांत मी, मजसि वेड आलें कसें ? ॥
कशास ? कुणी ? कां ? मला उगिच वेड हें लाविलें ? ।
कुणी ? मजसि कां ? इथें उगिच हें असें आणिलें ? ॥ ४५ ॥

नको ! शशि ! नको ! नको !! मजसिं हें नको वेड रे ! ।
नको ! मजसि प्राण हे त्यजुनि आज जाती खरे ! ॥
अहो, मज कसें अतां गमतसें अती घाबरें ।
शशी ! करि दया ! दया न करितां अतां मी मरें ॥ ४६ ॥

असा त्यजुनिया मला शशिहि दूर कां चालला ? ।
विहंगरवही कमीकमिच होउं कां लागला ? ॥
हरी ! तमहि वेढुनी मज असा कसा व्यापितो ? ।
असा कवण चेतनारविसि मेघ हा झांकितो ॥ ४७ ॥

धरीन म्हणतों तरी, मजसि कांहिं ना सांपडे ।
अघोर तम ग्रासितो, घडत काय आतां पुढें ? ॥
धरूं तरि कुठें ? निराश्रित बुडे, कशी हो गती ! ।
गमे मदिय चेतना खचित जात अस्तामती ॥ ४८ ॥

निराश्रितचि एकला सतत मी तमीं या बुडें ।
अघोर तम हा गिळी मजसि ! काय होई पुढें ? ॥
धरूं तरी कुठें ! तमीं गमत जीव माझा विरे ।
सरे सकल मीपणा, गमत 'मी'च आतां नुरे ॥ ४९ ॥

विचित्र घनिं या तमीं गमत सर्व संवित् बुडे ।
गमे मरण बोलती मजासि तेंच आतां पुढें ! ॥
दयाळ शशिदेव हे ! शशिहि हाय गेला कुठें ! ।
नको त्यजुं शशी ! शशी !! मरणकालिं आधार दे ॥ ५० ॥

नको विपिन तें मला, जगत तेंहि मातें नको ।
नको जगतिं जागृती, मजासि वेडही हें असो ॥
परी त्यजुनि तूं मला रजनिकान्त ! जाऊं नको ! ।
तसें, मजासि प्राण दे – मजासि मृत्यु देऊं नको" ! ॥५१॥

कुणी तरि धरा मला, कुणि तरी मला वांचवा ।
कसेंहि मज वागवा – मज छळा, मला लाडवा ॥
परी मजासि वांचवा – अगइ, काय या यातना ! ।
अहो विझलि हो अतां गमत मत्प्रिया चेतना ! ॥ ५२ ॥

नसे शशि, न इंद्रियें, न मुळिं चालतेही मती ।
मदीय आजि चेतना खचित जात अस्ताप्रती ॥
× × × × × ×
× × × × × × ॥ ५३ ॥

## प्रकरण चवथें

# उषा

स्वयें पवन हालुनी झुळुक भासते ती जशी ।
हळूं जल हलोनिया लहरि संभवे कीं जशी ॥
कळोनि भयहेतु कीं सळसळेच नागीणशी ।
मला लहरि अंतरीं प्रथम भासली ती तशी ॥ १ ॥

बुडे म्हणुनि पोहतां स्थिति नरासि येते जशी ।
सखी प्रथम पाहतां हृदयवृत्ति होते जशी ॥
समुद्र खवळोनियां स्थिति जलासि यावी जशी ।
मदीय पुढती स्थिती मग अवर्ण्य झाली तशी ॥ २ ॥

समुद्र मथितां निघे कमलवासिनी ती जशी ।
तुफान मन लोपतां मग प्रतिष्ठिता बुद्धि ती ॥
वनांत तरुघर्षणें जणुं दवाग्निजिव्हा जशी ।
तदा मजसि अंतरीं स्फुरत 'आत्मबुद्धी' तशी ॥ ३ ॥

तडित् निघत गोरटी भ्रमरकृष्णमेघांतुनी ।
कशी न कळतां जशी सुचत कल्पना ते मनीं ॥
प्रदोषनभिं ना कळे उमटते कशी चांदणी ।
तशी उमटली पुढें विमल 'आत्मता' मन्मनीं ॥ ४ ॥

गमे रजनिकालिं जें कमलबद्ध भृंगाप्रती ।
जसेंहि कलिकेमधें जखडिल्या सुगंधाप्रती ॥
अभिन्न जलदोदरीं गमत जेंवि वीजेप्रती ।
तसें मजासि वाटलें; प्रथम ‘ चित् ’ स्फुरें आंत ती ॥ ५ ॥

जसें गमत पावका दबुनि स्वीय रक्षेमधें ।
जसेंहि वडवाग्निला जलनिधीमधें वाटतें ॥
जसेंहि रविला गमे ग्रहण होत खग्रास तें ।
तसें मजासि वाटलें प्रथम चित् स्फुरें आंत तें ॥ ६ ॥

न कांहिं करिं लागतां नर तमीं जसा शोधितो ।
हताश, करि निग्रहा, जणुं नवीन योगीहि तो ॥
अनंत मनिं कल्पितां डळमळे जसा जीव तो ।
तसें घडत आंत जें करुनि यत्न मी पाहतों ॥ ७ ॥

वनीं विजनिं बैसुनी पिक मृदु स्वरें गात तो ।
वनीं विजनिं हिंडुनी मधुर नाद ता लोपतो ॥
प्रकाशगति ती क्रमें गिरिगुहातमीं कुंठते ।
तशी विफल होय तैं मग मदीय इच्छाहि ते ॥ ८ ॥

दिसे पडत तारका, परि मधेंच ती लोपते ।
शिखा त्यजुनि पावका निघत, लुप्त आकाशिं ते ।
विरे रजनिच्या तमीं सुखद तेज सायंन्हिचें ।
विलुप्त मधिं हो तयीं तशि मदीय इच्छाहि ते ॥ ९ ॥

उषा प्रकटतां जशा जगतिं या दिशा फांकती ।
हळूहळु पुन्हां जसे सकल नादही जागती ॥
पुन्हां सकल जीवही स्वमनिं चेतना पावती ।
पुन्हां जग हळूहळू दिसत रात्र ती लोपती ॥ १० ॥

तशा मम जिवामधें मग जरा दिशा फांकती ।
पुन्हां उगिच भास हो जणुं कुठें ध्वनी होत कीं ॥
पुन्हां मनिं विचारही गमति मंदसे जागती ।
पुन्हां मज हळूहळू स्फुरतसे तमीं जागृती ॥ ११ ॥

जसें सजल लोचनांतुनि दिसे जगत् दृष्टितें ।
सधूम अनलांतुनी जशि सुरेख वस्तू दिसे ॥
भयें विगत माधुरी रमणिशब्द जैसा निघे ।
तसें घडत जैं क्रिया करुनि आंत संवित् बघे ॥ १२ ॥

दिली तरुलतांप्रती हलवुनी उषाजागृती ।
सुगंधघनकर्ण ते गमति भोंवतीं वाहती ॥
उषासमयिं वाटतें मम जिवासि गोंजारिती ।
गमे मधुरिमाबळें सकस दिङ्मनें मोहिती ॥ १३ ॥

पुन्हां मधुर कूजना करुनियां मना मोहिती ।
असे गमति सृष्टिचे बसुनि लाडके बोलती ॥
कळे मजासि सर्व हें; मजासि आणखीही कळे ।
ललाटिं गमलें मला जणुं सुशीत कांहीं गळें ॥ १४ ॥

अयी ! सुतनुगंध हा ! सुखद स्पर्शही हा पुन्हा ! ।
गमे असत माहिती, अनुभवीं कधीं पूर्वि हा ॥
अहो भगवती उषा – भगवती उषा आलि ही ।
उषा समयिं या, मला उठविते स्वयें देवि ही ॥ १५ ॥

उषा मम जिवामधें, गमत बाहिरींही उषा ।
उषा कळत तेवढी; इतर तर्क व्हावा कसा ? ॥
उषाचि मज वाटलें उठविण्यासि आली मला ।
अहा ! मजसि देवता अजि दिसेल ही कोमला ! ॥१६॥

असें मनिं गमे न तों हृदयिं गारसें लागलें ।
निदाघधरणीवरी प्रथमवृष्टिसें वाटलें ॥
पुन्हां उसळुनी क्षणीं मनिं विचार कोंदाटले ।
मनीं प्रथम येत तें वचनिं व्यक्तही जाहलें ॥ १७ ॥

न जागृति, न मुग्धता, वचनिं ओघ हा चालला ।
" उषे ! भगवती पहा त्यजुनि हाहि जातो मला ॥
न दुष्ट मज तारितो; मजसि देवि तूं तारिं गे ! ।
अनाथ बघ देवि मी, मजसि तूं तरी तारिं गे ! ॥ १८ ॥

उषे ! खचित जीव तूं मजसि भेटली; सांग गे ।
असे जग कसें ? तुझेसहित सूर्य आला असे ? ॥
कसें तुजसि वाटतें मज घडेल आतां पुढें ? ।
नको मरण चिन्मये ! स्मरण दे मला तेवढें ! ॥ १९ ॥

तिचे न कळतां मला धरुनि हात मीं ठेविले ।
करोनि मग प्रश्न हे थबकलों, मला वाटलें ॥
इथें नव्हाति हो उषा ! नविन काय हें जाहलें ? ।
पुन्हां नविन कांहिं हें गमत विघ्न हो पातलें ॥ २० ॥

अभागि जरि मी खरा परि न अंत दुःखासि का ? ।
असे सकल सान्तही परि न दुःख हें सान्त का ? ॥
शशी शठ पळे मला त्यजुनि नीच चांडाळ तो ।
रमेश ! परि तूंहि रे अजुनि अंत कां पाहतो ? " ॥ २१ ॥

असें मनिं म्हणें न तों, पुनरपी ध्वनी ऐकिला ।
पुन्हां मधुर तो तसा असत शब्द मीं जाणिला ॥
" जरा तरिहि ऐक रे ! " म्हणुनि ऐकुं आलें मला ॥
परी परिसतां अतां सुटत कंप देहीं मला ॥ २२ ॥

विचार जुळवावया सकल यत्न मीं सोडिले ।
मृदू कर तिचे परी धरुनि घट्ट मीं ठेविले ॥
असो खचित कोणिही – नविन विघ्न, आधार वा ।
न धीर जंव तोंवरी असत तें तरी राहुं द्या ॥ २३ ॥

करोनि परि यत्न हे विफल हातही लोपले ।
मुळीं न कळतां मला सहज नाहिंसे जाहले ॥
विलुप्त जणुं यत्नही करुनि स्वप्न तें जागतां ।
तसें मजसि वाटलें मृदुल हात ते लोपतां ॥ २४ ॥

अहा ! वदनिं काय हें मधुर गारसें लागलें ? ।
हरी ! खचित विघ्न हें ! मजसि काय हें पाजिलें ? ॥
जिवा ! परि असे किती मधुर, गारही हें किती ! ।
जरी मरण देशि, दे हरि ! अशा विषानें मृती ! ॥ २५ ॥

सुधा मधुर ती किती नच जरी कधीं चाखिली ।
सुधाचि परि मी गमें खचित तेधवां चाखिली ॥
किती मधुर सांगु हो, नच जगीं तसें कांहिंही ॥
अहो नवल पेय तें वितरि शान्ति चित्तासही ॥ २६ ॥

सुखानुभव तेधवां अनुपमेय जो जाहला ।
अधीं नच कधीं तसा सकल जीवनीं पाहिला ॥
न वेड, नच क्षुब्धता, सकल त्रस्तता भंगली ।
क्षणांत मनिं गोडशी मजसि शान्तिही लाभली ॥ २७ ॥

अहा ! वदनिं सौख्य जें नयनिं तेंच हो जाहलें ! ।
कुणी अमृत हें पुन्हां नयनिं वाटलें लाविलें ॥
जयीं अमृत लाविलें, कर किती मृदू वाटले ! ।
जलार्द्रपटिं वाटलें कुणी जिवासि गुंडाळिलें ! ॥ २८ ॥

पुन्हां भरति कर्ण हे सुखद सौम्य नादामृतें ।
" अतां उघडिं नेत्र गा " ! म्हणुनि कोणिसें बोलतें ॥
तशीच सखि हे पुन्हां गमत गोड हें बोलते ।
न चित्त मम क्षुब्ध हें, गमत पूर्ण विश्वास्य तें ॥ २९ ॥

हळूं उघडि नेत्र मी, मजसमोर मीं पाहिलें ।
अथाक नभिं सर्व हें उजळ तेज कोंदाटलें ॥
जरा बघुनि तेज तें दिपुनि नेत्र मीं झांकिले ।
कुतूहलवशें पुन्हां उघडुनी पुन्हां पाहिलें ॥ ३० ॥

अफाट पसरें दिसें उजळ तेज ते दृष्टिला ।
अहो शशि इथें मघां रवि अतां कसा पातला ? ॥
निहाळुनि म्हणोनियां बघत मी तसा राहिलों ।
तदा नवल जाहलें, बघत मी तसा राहिलों ॥ ३१ ॥

स्वतांप्रति हळूंहळू अखडि तेज तें भोंवतीं ।
क्षणांत मग जाहलें मधुर शांत गोलाकृती ॥
मधें मग तयाचिया मजसि आकृती भासली ।
न झोंप, नच जागृती, मधिल स्वप्नशी वाटली ॥ ३२ ॥

स्फुरे मृगजलापरी सकल, शांत मी पाहतों ।
असेल तरि काय हें मनिं विचार हा घोळतो ॥
दिसे अधिकही धरा हळुहळूं उषःकालिं तें ।
तशीच मधुराकृती अधिक आकृती साधिते ॥ ३३ ॥

समीप सरतां जशी अधिक स्पष्ट वस्तू दिसे ।
फुलोनि कलिका खुले कुसुम गोड किंवा जसें ॥
शशी उगवतां जसा हळुहळू प्रभावान् दिसे ।
तिला रमणिरूप मीं खुलत पाहिलें हो तसें ॥ ३४ ॥

विलोल सुरसुंदरी बघत जाहली आकृती ।
विलोल मृदु तेज तें झुलत आकृतीभोंवतीं ॥
विलोल मग रंग तो खुलतसे गुलाबी तिला ।
गुलाबनिचयामधें जणुं प्रकाश हा कोंदला ॥ ३५ ॥

जरीहि तिज आकृती, तरल तो किती देह हो ।
जणुं घनाचि नाहिं हा बघुनियां असा भास हो ।
प्रकाशमय देहही भंवति तेजही तेज हो ! ।
हरी ! बघुनियां गमे इज न दृष्ट माझीच हो ॥ ३६ ॥

नसेल घनता मुळीं तरि घडेल सृष्टी कशी ? ।
परी न घनता तिथें जगतिं या दिसे ही अशी ॥
अती तरल द्रव्य तें सकल दीप्तिमान् सृष्टि ते ।
अनेक स्थलिं शोभती मधुर रंगसंघात ते ॥ ३७ ॥

प्रकाशमय रंगिंची सकल सृष्टि ती ओतिली ।
पुरीं न पडतील हो कितिहि वर्णनें वर्णिलीं ॥
सुरेख किति रंगही विविध वर्णसंमिश्रणें ।
तुझ्याहि नशिबीं असो कधिं तरी तसें पाहणें ! ॥ ३८ ॥

असो; मजसि ती जयीं सकल आकृती दीसली ।
तयीं सहज दृष्टि ही वदनिं कीं तिच्या लागली ॥
दयामय विशाल ते नयन हर्षुनी हांसले ।
तिथें शशिहि हारला, कमळ तेंहि हो हारलें ! ॥ ३९

दया सतत प्रेमही नयन वर्षिती सारखे ।
जणुं जननि ही करी जवळि लेंकरूं पारखें ॥
गमे जवळि जाउनी ·चरण वंद्य हे वंदुनी ।
पुढें इजसि " आइ गे ! " म्हणुनि हांक मारूं झणीं ॥४०॥

न निश्चयहि जाहला, झटिति देह हा हालला ।
पडोनि चरणावरी म्हणत " वंदिं माते तुला " ॥
न हर्ष मनिं मावतो, कर तिनें शिरीं ठेविला ।
गमे जगतिं जीव हा जगुनि धन्य हो जाहला ॥ ४१ ॥

अशी अतुलरूपिणी ! खचित देवता ही कुणी ।
अशी मधुरभाषिणी ! खचित देवता ही कुणी ॥
प्रभा जणुं दिवामणी ! खचित देवता ही कुणी ।
दयानयनवर्षिणी – रमणि देवता ही कुणी ॥ ४२ ॥

कितीहि जरि सोशिले, सफल कष्ट ते जाहले ! ।
असें अतुल कांहिं हें नयनिं एकदां पाहिलें ! ॥
घडो मजसि ही अतां करिल तोंचि, आधार हा ।
अशी असत ती कधीं तरिहि दुःख देईल का ? ॥४३॥

असें हृदयिं वाटलें वरि पुन्हां तदा पाहिलें ।
अहो नवल रूप तें पुनरपी सुखें हांसलें ! ॥
दयार्द्र मग दृष्टिनें मजासि एकदां पाहिलें ।
तिचे अधर हालले, मजसि हें तिनें बोलिलें ॥ ४४ ॥

म्हणे मजसि “ बाल ! हें करिसि काय ऐसें तरी ।
मिळोनि तुज भाग्य हें, रडसि कां अभाग्यापरी ? ॥
पहा, नयनिं हा पहा शुभ सरस्वतीलोक हा ।
दिसे न सकलांस गा, तुज दिसे सुदैवें महा ॥ ४५ ॥

विहार करणें मनीं कवनकाननीं त्या जरी ।
स्वयेंचि मग कां असा उशिर लावितोसी तरी ॥
तिथें भगवती असे बघ सरस्वती बैसली ।
उठें ! करुनि प्रार्थना मिळविं रे अनुज्ञा भली ” ॥ ४६ ॥

तडित् बघुनि वाटतें परिसतां तसा जाहलों ।
फुलोनि हरिखें गमे गगनिं उंच मी चाललों ॥
कळे न वदुं काय मी करुंहि काय, झालों असा ।
उठोनि सुदतीप्रती पुसतसेंचि सोत्कंठसा ॥ ४७ ॥

“ अये नवल काय हें ! असत शारदालोक हा ? ।
अये सजणि गे वदें, मज दिसेल ती देवि का ? ॥
कुठें भगवती असे ? मजशि देवि बोलेल का ? ।
अयोग्य मम दर्शना म्हणुनि देवि कोपेल का ? ॥ ४८ ॥

न दीन जन देवि का जवळि येउं देई, वदें ।
असोंहि जरि दीन मी, सुजन मी तिला तूं वदें ॥
तरीहि मग दर्शना मज न देवि देईल का ? ।
न हे तिजसि पाहुनी नयन धन्य होतील का ? ॥ ४९ ॥

नसे तरि नको मला निरस काव्यकान्तार तें ।
त्यजी जग तसें मला अतुल दैव हें लाभतें ! ॥
बघेन तिज एकदां नयनिं शारदादेविला ।
गणीन मग नित्य मी सफळ जन्म हा जाहला ॥ ५० ॥

मला सखिजनीं तदा फसवुनी इथें आणिलें ।
परी मजसि भाग्य हें सहज केवढें लाभलें ॥
दिसेल मज आज ही भगवती दुराराध्य जे ।
नसे तरि नको मला निरस काव्यकान्तार तें ॥ ५१ ॥

कितीहि कुणि गांजिलें परिहि दैव जें दैव तें ।
तयीं बहुत गांजिलें परि मिळे मला भाग्य हें ॥
सुदैविच खराचि मी – मजसि शारदा भेटते ! ।
नसे तरि नको मला निरस काव्यकान्तार तें ॥ ५२ ॥

“ किती वदासि बालका ! असासि अज्ञ ” देवी म्हणे ।
“ तिचोंचि वन तें तिच्या दिसत का अनुज्ञेविणें ? ॥
असे भगवतीच ही कवनकाननस्वामिनी ॥
तुला कवण नेइ बा जंवरि नाहिं आज्ञा वनीं ॥ ५३ ॥

म्हणोनिच मुला ! तुला सखिजनीं इथें आणिलें ।
तुवां उतरुनी इथें मग अनर्थ हे मांडिले ! ॥
अनेक जन पाहिले, सखिजनीं इथें आणिले ।
पुनीत मग होउनी इथुनि काननीं रंगले ॥ ५४ ॥

परी कृति अशा तुझ्यापरिस बा, न म्यां पाहिल्या ।
हरी ! भगवतीप्रती उघड बा, शिव्या त्वां दिल्या ! ॥
दयाजलधि माउली म्हणुनि त्या तिनें सोशिल्या ।
दुजें कुणि असे तरी पचति चापलें हीं तुला ? ॥ ५५ ॥

तुझें सुकृत पूर्विचें, तुजसि योग हा लाधला ।
अतां भगवतीप्रती स्तवुनि घेइं आज्ञा मुला ॥
तुला,"– मनिं असे तिचे अधिक बोलणें कांहिंसें ।
परी तिजसि थांबवीं मधिंच मूर्खसा मी पुसें ॥ ५६ ॥

" रिघाव कवितावनीं नसत शारदाज्ञेविना ।
न कां जगतिं हें मला कथिति काव्यपुष्पांगना ? ॥
' अतां तुजसि नेतसों प्रथम शारदालोकिं रे ' ।
असेंहि कथिलें न गे, मजसि दुःख येथें दिलें ॥ ५७ ॥

" न मानि मनिं खेद बा, सकल हें सहेतू " म्हणे ।
" न रीति मुळिं कांहिं हें नवकवीप्रती सांगणें ॥
म्हणेल मनिं कोणिही ' कवनकाननीं जाउं या ' ।
परी सहज हें नसे, भगवती परीक्षी तया ॥ ५८ ॥

तुला छळुनि लाभ तो कवण शारदादेविला ? ।
अशीहि मति निष्ठुरा कधिंहि संभवे का तिला ? ॥
असाचि कविला सदा नविन आणुनी सोडिती ।
स्थलाविषयिं कैवि या करित तर्क तें पाहती ॥ ५९ ॥

नवी ललित कल्पना सुचत कीं न, हें पाहती ।
विचारचि करीत वा हृदयवृत्तिही जागती ॥
असे हृदय आर्द्रही, ललित कल्पनाही सुचे ।
अशासि मग भाग्य तें मिळत काव्यकान्तारिचें ॥ ६० ॥

अम्ही तवहि पाहिली करुनि बा, परीक्षा अशी " ।
इथें थबकली, दया नयनिं वाढली थोडिशी ॥
म्हणे हळु पुढें " न योग्य जरि बा, असावा तसा ।
तरीहि गमसी अम्हां अससि मात्र चालेलसा " ॥ ६१ ॥

मधेंच जयिं थांबली हृदय कांपलें भीतिनें ।
परी नयनिं ती दया बघुनि शांत वाटे तिनें ॥
सहर्ष परि वाक्य जें वदत शेवटींचें सती ।
असें तरि म्हणेल ही नव्हति हो मला शाश्वती ! ॥ ६२ ॥

अतां मजसि शारदा मज दिसेल कान्तारही ।
किती हरिख सांगु हो, मजसि लाभतें दोन्हिही ॥
मनीं मजसि धीर ये; गमत व्यर्थ ना जन्मलों ।
गुणी असत खास मी म्हणुनि पात्र या जाहलों ॥ ६३ ॥

परी गुणवती सती मज न त्या इथें आणित्या ।
तरी मजसि कोठुनी परम लाभ हा लाभता ? ॥
किती खचित मूर्ख मी उगिच दोष त्यांतें दिला ।
असा नच कृतघ्नही कधिंहि मूर्ख म्यां पाहिला ॥ ६४ ॥

नसे मजसि माहिती, न तरि जाउं देतोंचि ना ।
‘ करा रमणिनो क्षमा ’ म्हणुनि मागतों मी क्षमा ॥
कसा खचित मूर्ख मी, नच विचार केला तदा ।
अतां उगिच दुःख हें करुनि काय हो फायदा? ॥६५॥

सख्या न म्हणतील का मनिं – ‘ कृतघ्न झालाचि हा ।
करोनि इतुकेंहि ते विफल कष्ट गेले पहा ’ ॥
न आणितिल त्या पुन्हां मनुज अप्रसन्ना सती ।
करीं विपिन बंद मी खल, मनुष्यजातीप्रती ॥ ६६ ॥

अतां कुठुनि त्या सख्या ! सुदति त्या कुठें जाति हो ।
मघांचि सुचलें न हें, खचित मूर्खता झालि हो ! ॥
अतां मजसि पाप हें सकल जन्म हो लागलें ।
असें मजसि वाटलें, नयनिं अश्रुही पातले ॥ ६७ ॥

बघोनि रमणी म्हणे “ रडसि कां अतां बालका ? ।
कसें समजवूं गडे ! अजुनि दुःख आहेच का ?” ॥
म्हणें तिजसि मी “ सये सखिजनांसि मी दोष दे ।
अतां हृदयिं टोंचते अति कृतघ्नता झालि ते ! ॥ ६८ ॥

अतां कुठुनि त्या सख्या ! मजसि लाज वाटे अतां ।
कसें वदुं ? कसें तया वदन दावुं त्या भेटतां ? ॥
न भेट जरि शक्यही हृदयिं शल्य हें राहिलें ।
कृतघ्न खल मी, असें उपकृतीस त्या फेडिलें !” ॥ ६९ ॥

“ नको तुजासि शोक हा ” म्हणत देवि मातें तदा ।
“ घडेल तव भेटही सजाणि येथ आहेत त्या ॥
तिथें विहरती सरीं, दिसति त्या तिथें, त्या पहा ।
तुलाहि दिसतील जैं उतरशील स्नानासि बा ” ॥ ७० ॥

“ कशासि मज स्नान हें ” कुतुहलें पुसें देविला ।
म्हणे मज “ सरस्वती किती पवित्र आहे मुला ! ॥
अमंगलाचि देह हा तिजपुढेंहि नेशील का ? ।
अशासि मग दर्शना भगवतीहि देईल का ? ॥ ७१ ॥

इथें करुनि स्नान बा, तुजासि दिव्य कायाहि ते ।
मिळेल, शुभदर्शना भगवतीचिया योग्य जे ॥
तिचे चरण लागुनी सलिल तीर्थ हें जाहलें ।
मघांहि वदनीं तुझ्या सलिल हेंचि म्यां टाकिलें ॥ ७२ ॥

तिच्या चरणपंकजें जल पुनीत जें जाहलें ।
पिऊनि जल बालका, तुजसि प्राण हे लाधले ॥
अतां नविन प्राण हे नविन देहही घे अतां ।
जलासि करिं वंदना प्रथम, आंत जा मागुता ” ॥ ७३ ॥

“ परी ” म्हणत मी तिला “ तुजासि आकृती ये अतां ।
अतांचि तुज पाहिलें नयनिं आकृती साधितां ॥
मघां मग कसें तुवां मजासि तीर्थ हें पाजिलें ।
शिरीं, हृदयिं, लोचनीं, मजासि तीर्थ त्वां लाविलें ? ॥ ७४ ॥

जशी कविमनामधें सुरस कल्पना जन्मतें ।
विकास मग पावुनी फुगुनि काव्यरूपें फुटे ॥
तिचें वदन आधिं तें झळकलें विनोदें तसें ।
विनोद विकसोनियां सजणि हांसली काव्यसें ॥ ७५ ॥

म्हणे " जगतिं नाम जें तुजसि तेंचि ज्याला असे ।
असा कुणितरी दुजा जगतिं त्या असावा असें ॥
असे अमर देवता, मजसि जन्ममृत्यू नसे ।
कळे न मज प्रश्न हे पुससि केविं बाळा, असे ? ॥ ७६ ॥

न ये मजसि आकृती परि तुला दिसों लागलें ।
मघां नयनिं मी तुझ्या जल पुनीत हें लाविलें ॥
म्हणोनि तुज लोकिं या हळुंहळूं दिसों लागलें ।
तयें तुज गमे मला वरित आकृती पाहिलें ॥ ७७ ॥

अतां परि पुरे गडे ! उगिच फार तूं बोलशी ।
उडी तरि जळामधें प्रथम टाक पाहूं कशी ॥
उशीर जरि आणखी उगिच बोलुनी लाविशी–" ।
म्हणे स्मितमुखी सखी–'त्यजुनि मीहि जातें कशी' ॥ ७८ ॥

न कांहिं मुळिं बोलतां प्रथम मी उभा राहिलों ।
परी अधिक प्रश्न ये मनिं, पुन्हां मधें थांबलों ॥
" सये " म्हणतसें हळूं " पुसत प्रश्न; कोपूं नको ।
कथीं मजसि येवढें, पुढति कांहिं सांगूं नको ॥ ७९ ॥

न नांव तव ठाउकें, तुजशि हांक मारूं कशी ।
कथीं मधुर नांव तें सजणि तेवढें गे मशीं ॥
पुन्हां जरि कुठें मधें चुकुनि दूर जाशी गडे ।
उगें मज पडेल गे मधिंच हें पुन्हा सांकडें ॥ ८० ॥

पुन्हां मधुर हांसुनी म्हणत 'मूर्ख आहेस गा ।
न या असत 'नाम' ही मुळिं मुला, उपाधी जगा ॥
स्वरूप जरि या जगीं, परि न नाम येथें असे ।
न हांक परि बाहण्या स्मरण बा, पुरेसें असे' ॥ ८१ ॥

जरीहि कथिलें तिनें तरि न चित्त हें शांत हो ।
न नाम जगतीं कसें, मजसि कल्पनाही न हो ॥
म्हणें तिजासि शेवटीं –" भगवती तुला मी नमीं ।
नसो तुजसि या जगीं तरिहि नांव देईन मी ॥ ८२ ॥

नसे कळत गे सये, मजसि कांहिं नांवाविणें ।
नसे मुळिंच नांव तें सकल खुंटलें बोलणें ॥
असो तुज नसो परी मज गमे न नांवाविना ।
'उषा' गमलि; तेंच मी म्हणुनि शांतवी मन्मना" ॥८३॥

पुन्हा हंसुनि ती म्हणे " तुज रुचे तरी नांव दे ।
जसें तुजसि येतसे मजासि त्याच रीतीं वदें ॥
अतां तरिहि भागलें ? करिं त्वरें अतां स्नान गा ।
पुसोनि तिजला बघें मग सरस्वतीच्या जगा " ॥ ८४ ॥

पुढें न मग थांबलों, सरुनि मी पुढें जाहलों ।
बघोनि जल तें पुढें हरिसि मी स्मरों लागलों ॥
स्मरोनि हरि एकदां जलिं सुखें उडी टाकिली ।
अहा किति किती पुढें खचित मौज म्यां पाहिली !॥८५॥

## प्रकरण पांचवें

# सरस्वतीलोक

शिरोनि सलिलामधें गमत खोल मी चाललों ।
परी तयिंच कीं गमे उडुनि उंचही चाललों ॥
न खालिं वरिं हें कळे, तरि कुठेंतरी चाललों – ।
असेंहि गमतां गमें खचित उंच मी चाललों ॥ १ ॥

मऊ मखमलीमधें मजसि काय गुंडाळिलें ।
शशीकिरणिं सर्वथा कुमुदिनीस वा वेष्टिलें ॥
मनाभंवतिं हर्ष कीं, गमत वारि देहा तसें ।
विशुद्धतर देहही धुवुनि वृत्तिही होतसे ॥ २ ॥

शिरें सकल देहिं तें नवल वारि वायूपरी ।
करी विमल देहाचित् तरल तेंवि दोन्ही करी ॥
सशीर्षचरणांगुलीं सलिल देहिं सारें फिरे ।
फिरे जलिंहि मी तसा बुडुनि खोल नीरामधें ॥ ३ ॥

---

१ देह व चित्

कधीं मनुज हर्षतो, हृदयिं हर्ष कोंदाटतो ।
तयींच पट सारुनी जगतिं मूळ आनंद तो ॥
स्वयें नयनिं पाहतो, – भरत आंत बाहेरही ।
तसें सुखद नीर तें स्फुरत आंत बाहेरही ॥ ४ ॥

जंई प्रथम त्या सख्या मज जगांतुनी आणिती ।
करें मृदुल वेढुनी गगनिं त्या मला वाहती ॥
तंई मजासि जाणवे अनुपमेयसा स्पर्श जो ।
अहा जलिं इथें गमे फिरुनि होतसे काय तो ॥ ५ ॥

सुधा म्हणति गोड ती, वदनिं ना कधीं चाखिली ।
परी खचित त्वग्सुधेमधिंच कीं बुडी मारिली ॥
असें मजासि वाटलें; मजसि तीर्थ जें पाजिलें ।
तदा प्रथम जें मुखीं सकल देहिं तें वाटलें ॥ ६ ॥

जलीं तईच मी सुखीं बुडुनि दग तें जाहलों ।
भरोनि सुख देहिं तें विरत वाटलें चाललों ॥
विरे जरिहि देह हा गमत तीव्र 'मी' होतसें ।
अशा स्थितिंत गुंग तों फिरुनि मी वरीं येतसें ॥ ७ ॥

वरीं फिरुनि यं तदा फिरुनि जागृती पावलों ।
किती विमल तेविं कीं तरल देहिं मी जागलों ! ॥
किती नविन वाटलें ! किती पुनःपुन्हां पाहिला ।
मनोंचि कुरवाळिला, कितिक चोज देहीं मला ! ॥ ८ ॥

बलाढ्यजनमानसीं स्वबलहीनताभाससा ।
सधूम लघु दीपिका उजळ राजगेहीं तसा ॥
जणूं प्रियजनाप्रती कुशल प्रश्न साशंकसा ।
असेन दिसलों गमे सकल लोकिं त्या मी तसा ॥ ९ ॥

नवीन मम देह तो प्रथम ओळखेना मला ।
परी असत तोचि 'मी' म्हणुनि मी म्हणें मीं मला ॥
पुन्हा बघत कौतुकें, अगइ ! तों मला भोंवतें–।
न दिव्य परि मंदसें–दिसत तेज माझ्याहि तें ॥ १० ॥

अहो नवल ! रंगही मृदुल, तोजें मीं पाहिला ।
मलाहि चढला असे पुसटसा गुलाबी भला ! ॥
अहा विमल कान्तिमान् तरल देह मी पावलों ।
असें बघुनि हर्षुनी उगिच बागडूं लागलों ॥ ११ ॥

सुमभ्रमर हो अळी, अनल होय तैं कोळसा ।
मिळोनि नव देह तो हृदयिं हर्षलों मी तसा ॥
कुठें तरि कसा तरी तयिं सुखावुनी पोहलों ।
नवीन मम देह तो कितिकदां बघों लागलों ! ॥ १२ ॥

जशी विमल कीं असे तरल दिव्य कायाहि ती ।
नवी तशिच देहिं त्या सुखद भासते जागृती ॥
अहो नच सुखावुनी खचित मी तिथें पोहलों ।
कुठें तरि कसा तरी जलिंच नाचलों धांवलों ! ॥ १३ ॥

असें जल विचित्र तें बुडवि ना कुणातें कधीं–।
न संतरण जाणतां उतरु सुज्ञ वा मूढधी ॥
असोनि जल, आर्द्रता मुळिंच नाहिं त्याला पहा ! ।
भिजे न कुणिं पोहतां तरिहि शुद्धि देई महा ! ॥ १४ ॥
न केवलचि पोहणें, असत शक्यही चालणें ।
विचित्र जालिं त्या असे सहज शक्य वा धावणें ॥
तळींहि जलपृष्ठिं वा कुणिहि स्वस्थ कीं बैसणें ।
सुखें, न बुडतां, गमे मनिं तरी जलीं नाचणें ! ॥ १५ ॥
कसा तरि सुखें असा सहज पोहतां धावलों ।
परी भगवती उषा मधिंच भेटतां थांबलों ॥
बघोनि मम मूर्खता हंसत पाहिली कोमला ।
स्वयेंचि तई लाजुनी त्यजिलि वृत्ति उच्छृंखला ॥ १६ ॥
करोनि तिज वंदना धरित लाजुनी मौन मी ।
मलाहि चतुरा तदा वरुनि मूकवृत्ती नमी ॥
मनीं अधिक लाजुनी नयन बाजुला मी करीं ॥
बघोनि मग ती वदे मजसि सस्मिता सुंदरी ॥ १७ ॥
“ अहा, तुजसि बालका, नविन देह साजे बरा ।
अतां असशि दर्शना खचित योग्य झाला खरा ॥
अतां तरिहि येशि का भगवतीचिया दर्शना ? ।
असेचि मनिं राहिलें अजुनि कांहिं किंवा पुन्हां ?” ॥१८॥

---

१, सरस्वतीच्या.

विचार करुनी मनीं म्हणत मी तिला देविला ।
" न कांहिं मनिं राहिलें; परि सये गमे गे मला– ॥
क्षणैक रमुनी इथें मजसि लोक हा पाहुं दे ।
असें सजणि, मूढ मी, संवय गे मला होउं दे ॥ १९ ॥

न जों संवय जाहली, असत अज्ञ जों लोकिं या ।
कुठें उगिच मी कसा मग भकेन ना नेम या ॥
म्हणोनि सदये ! मला क्षणभरी इथें राहुं दे ।
फिरोनि, बघुनी, मला संवय लोकिं या होउं दे " ॥ २० ॥

दया नयनिं फांकली, सजणि मंजुसें हांसली ।
जणूं रमणिचीं कुणा हळुंच कंकणें वाजलीं ! ॥
" बरें " म्हणुनियां पुढें मग सहास ती राजसा ।
म्हणे मजसि " पाहुंही, सरसिं पोहुंही, ये असा " ॥२१॥

सवें मग तिच्या, सरीं उसळुनी पुढें लोटलों ।
अकल्पित अहा, सख्या प्रथम[1], त्यांमधें पातलों ! ॥
सख्याहि पहिल्या, तिथें भगवती उषाही असे ।
अम्हीं फिरत पोहतां सरसिं चित्त काव्यीं जसें ॥ २२ ॥

---

१, पहिल्या.

सख्यांसि पहिल्या तिथें बघुनि लाजुनी मी म्हणें ।
" अहा ! फिरुनि भेटलां ! करित नम्र मी वंदनें ॥
मघां नच कळोनियां चुकुनि दोष मीं जे दिले ।
तुम्ही श्रवुनि तें दयाळ मन नाहिंना कोपलें ? ॥ २३ ॥

असें खचित मूर्ख मी, मजसि पूर्ण हें ठाउकें ।
उगें चिडुनि बोळलों चुकुनि मूर्ख मी वाउगें ॥
दयाळ ! अपराध हा तुम्हि न पोटिं घालाल का ? ।
पुन्हां नच वदाल का करुनियां क्षमा बालका ? " ॥२४॥

वदें तरिहि काय मी, म्हणुनि ऐकण्यातें सती ।
जमोनि मजभोंवतीं श्रवण देउनी ऐकिती ॥
कळे न जणुं काय हें म्हणत मी तयां संप्रती– ।
अशा चकितलोचना बघति एकमेकींप्रती ॥ २५ ॥

कुणी मग तयांतुनी मजासि राजसा बोलली ।
– अहा, फिरुनि वेणु ही जणुं मुरारिची वाजली ! – ॥
म्हणे " नच अधीं अम्हां असत ठाऊकें बालका ।
कधीं वदसि काय तूं, मग उगाच, हा खेद कां ? " ॥२६॥

बरें हृदयिं वाटलें, फिरुनि स्वस्थ झालें मन ।
न मी अधिक बोललों, करित उत्तरा कांहिं न ॥
प्रसन्न असती सती बघुनि हृष्ट मी जाहलों ।
सुखें फुलुनियां पुन्हां जलविहारिं मी रंगलों ॥ २७ ॥

जशा फिरति कीं प्रियस्मृति प्रियस्थलाभोंवतीं ।
तशा मजसभोंवतीं गुणवती सती पोहती ॥
सरींहि कमलावरी कितिक सुंदरी पाहिल्या ।
प्रभेस्तव मघां मला दुरुनि चांदण्या भासल्या ॥ २८ ॥

कसेंचि जशि दाखवी जगत हेंचि कोपांधता ।
तसें जगत तेंचि मी प्रथम पाहिं कैसें स्वतां ॥
अतांपरिच लोपतां सकल मोह -- मायाच ती -- ।
नसे भ्रम कुठें, कळे सहज लोक हा संप्रती ॥ २९ ॥

अतां कळत हो मला नभ नसे, असे वारि हें ।
सरीं मृदु सरोरुहें उमललीं न हो चित्र हें ॥
जलीं कुठुनि चांदण्या? नसत काय वेडाच मी ? ।
प्रभामय सती मला गमति चांदण्या लांबुनी ॥ ३० ॥

तटीं रमणि गोमटी सहज कोणि धावे सती ।
अशी सहज धावतां कमल उन्मुखी झेलि ती ॥
कसें गमत तें मघां कमल झेलते चांदणी? ।
कळे मजसि लोक हा मुळिं अतां न शंका मनीं ॥ ३१ ॥

अहो मज सरस्वती भगवती शशी भासली! ।
कशी न कळतें मघां मजसि भ्रांति ही जाहली ॥
असे सकल स्पष्ट हें, उघड सर्व आहे, दिसे ।
कळे न विपरीत हें मजसि भासलें कां, कसें ॥ ३२ ॥

अहा, दिसति--त्या पहा दिसाति, खेळती सुंदरी ! – ।
किती रमणि सैकतामधिं बसोनि तीरावरी ॥
सरींहि किति खेळती, जलिं सरोरुहीं वा तशा ।
अहा खचित येथ मी कवण येइ भाग्यें अशा ! ॥ ३३ ॥
असंख्य नव वेंचुनी रमणि आणि[1] रत्नें कुणी – ।
तरंगमय लोल त्या जलिं सरस्तलीं जाउनी ॥
बसोनि पुलिनामधें करित वालुकेच्या वरी ।
मणी सकल मांडुनी गगनदृश्य[2] ती सुंदरी ॥ ३४ ॥
सुनील मणि ठेवुनी गगन, तारका मौक्तिकें ।
शनी शनिमणी, करी सजणि मंगला माणिकें ॥
तसाचि करि चंद्रमा खचुनियां हिरे, राजसा ।
हिरे जवळिचे तिच्या सरति, तो न हो पूर्णसा ॥ ३५ ॥
म्हणोनि मणि आणखी रमणि आणण्या चालली ।
पुन्हां सरसिं जों बुडे, सखि तिथें दुजी पातली ॥
तिनें बघुनि खेळ तो तटिं तिथें तसा मांडिला[3] ।
हिरे सकल घेउनी पळत हासिनी कोमला ॥ ३६ ॥

---

१, आणी. २, आकाशाचा देखावा. ३, मांडिलेला.

सरोवरजलांतुनी निघुनि सुंदरी जों बघे ।
"अयी" म्हणत "हे मणी सकल चोरिले कोणि गे?" ॥
असें न मनिं जों म्हणे सजणि चोरटी लांबुनी ।
बघोनि, मग चांदणी पळत चांदणीमागुनी ! ॥ ३७ ॥

बसोनि कमलावरी चतुर कोणि ती सुंदरी ।
म्हणे " आजि महेंद्र मी सजणिंनो, द्युलोकावरी ॥
अशी बसुनि येथ तूं सज बृहस्पती, वायु तूं ।
बसें वरुण येथ तूं, जवळिं ये शची येथ तूं" ॥ ३८ ॥

सभा सकल जों अशी थटुनियां बसे भोंवतीं ।
शचीहि कुणि जाहली चतुर साजणी त्यांमधीं ॥
वरी हंसत बोलतां कमलनाल तो तोडिला ।
तिनें जलिं सभासदस्थ गण सर्व तो लोटिला ! ॥ ३९ ॥

सुखें सकल हांसल्या, फिरुनि सर्वहि पांगल्या ।
कुठें कुणि कशामधें कुणि कशामधें गुंतल्या ॥
पुन्हां बघत जों तटीं नविन मौज मी पाहिली ।
अहा हृदयवृत्ति ही बघुनि तन्मया जाहली ! ॥ ४० ॥

कुणी खचुनिया मणी रचुनी श्याम तो कृष्णजी ।
किरीट शिरिं तो तुरा मणिमयूरपिच्छें रची ॥
प्रभा सकल ती हिरे रचुनि मोतिंही कीं करी ।
बघे तशि तयाकडे मग तटस्थ ते गोजिरी ॥ ४१ ॥

करीं मधुरवादिनी सजाणि घेत वीणा, सुखें — ।
बघे हरिस, राधिकाविरहगीत गाते मुखें ॥
तिचा स्वन, हरीपुढें, विरहगीत, गानामधें !
अशा सकल मंगलीं नच सुखें मरे कोण ते ! ॥ ४२ ॥

विलासचतुरा अशा किति कशा वदूं खेळती ।
अहो थकत, वर्णितां चतुर खेळ ते, ही मती ॥
अशी अमित मौज मीं सकल पाहिली भोंवतें ।
स्मरोनि अजुनी सुखें हृदय आंतुनी कोंदतें ! ॥ ४३ ॥

तिथें विहरती सरीं कितिक अप्सरासुन्दरी ।
किती विमल यक्षिणी, उरगबालिका[1], किन्नरी ॥
किती जलविहारही करिति सिद्धनारी तशा ।
किती नयनहारिणी रमणि दिव्य गंधर्वजा ! ॥ ४४ ॥

सरोवर अपार तें, मुळिं न तीर नेत्रां दिसे ।
असे जवळ भू मला दिसत तेवढी ती असे ॥
अथाक मग भोंवतें सलिल लोल सारें दिसे ।
बघोनि रमणीयता नयन होति तेथें पिसे ! ॥ ४५ ॥

---

१, नागकन्या.

प्रभा, कमल, सुंदरी, सलिल लोल, ही भव्यता ।
अशीहि रमणीयता, विमलताहि, विश्रांतता ॥
अशी शुभ पवित्रता, बघुनि दिव्य शांती तशी ।
कळे न कुणिं सृष्टि ही अनुपमेय केली अशी ! ॥ ४६ ॥

कमाल सृजनेमधें जरि असे कुठें जाहली ।
तरी खचित ती असे सकल येथ हो सांठली ॥
असोनि सृजनेमधें विधिचिया कुठें सुंदर ।
इथें नसत तें, असें नसत अन्य लोकांवर ॥ ४७ ॥

समस्त जगमंगलां, खचुनियां मनोमंगलां ।
शुभां नयनमंगलां, श्रवणिंच्या तशा मंगलां ॥
भरोनि सुखमंगलां, सकल कल्पनामंगलां ।
अशा सकल मंगलां जडुनि लोक हा निर्मिला ॥ ४८ ॥

प्रकाशमय सर्वही म्हणुनि येथ छाया नसे ।
प्रकाश रविचंद्र वा वरुनि कोणि ना देतसे ! ॥
जशी उडत धूलिका जगिं नभीं धरेपासुनी ।
प्रकाश उधळे वरी नभिं तसा इथें खालुनी ॥ ४९ ॥

जणूं सकल पेटलें, परि जळे न कांहीं कुठें ! ।
जणूं जलहि पेटलें ! परि जळे कधीं तें कुठें ? ॥
अहा जळत मीहि हें गमत देह हा पाहुनी ! ।
परी हृदयिं शांति जी, मधुर काय हो तीहुनी ! ॥५०॥

१८५४२

असंख्य किति देवता पसरल्या सरोभीतरीं ।
जणों जळति त्याहि कीं मधुरहासिनी सुंदरी ! ॥
सुवर्णरसकान्तिचें उजळ तेज जीचें अशी ।
कुणी खुलत पश्चिमा जणुं शरद्दिनान्ता तशी ॥ ५१ ॥

विलोल विलसे कुणां जलद्नीलभा नाजुक ।
गमे म्हणुनि चोरिली नभविभा हिनें तोषक ॥
सुनील, अनलाविणें, फिरत अग्निजिव्हाच कीं ।
अशा किति चमत्कृती दिसति मोहिती या जगीं ॥ ५२ ॥

कुणां, नयन दास हे हरुनियां करी तो असा ।
असे उजळ फांकला हरित भोवतीं गोडसा ॥
गमे नयनतृप्ति ही सजिव मूर्तिमान् पातली ।
जगांतिल वनें जणों फिकट ओस कीं जाहलीं ! ॥ ५३ ॥

कुणा सुजन देवतेप्रति असे फिका जांभळा ।
बघोनि क्षितिजावरी तिजसि दूर, वाटे मला — ॥
जणूं कुणि महर्षिचा मखचि तेथ हा चालला ।
दिसे दुरुनि येथुनी प्रखर कुंड त्याचें मला ॥ ५४ ॥

असे, गमत, वा कुठें शिखर अद्रिचें पेटलें ।
मला दुरुनि पाहतां धरणिसान्निधीं भासलें ॥
असे कितिक वर्णही कितिक देवताही तिथें ।
समर्थ तरि मोजण्या मनुजबुद्धि हो काय तें ? ॥ ५५ ॥

जगांतिल जसे तिथें असति सर्वही रंग ते ।
नवीनहि तसे किती जगतिं ज्यां न नांवें असे ॥
असे मधुर वर्ण कीं — जणुं प्रसन्नता मूर्तिमान् !
फुलेंचि जणुं दृष्टिचीं ! — असति वर्णनें हीं किमान् ॥५६॥
गमे असत जे सुधा वचनिं चारुगात्रींचिया ।
स्वभाविं, ताशि वर्तनीं, अमृत सर्व तें कालिं या ॥
न मावताचि देहिं कीं म्हणुनि होउनि वर्णता ।
अशी पडत बाहिरीं सकल त्यांचिया भोंवतां ॥ ५७ ॥
असे मधुर रंग कीं जणुं सुधात्व हें दृश्यमान् ।
असे अतुल रंग कीं जणुं सुखेंचि हीं कान्तिमान् ॥
असे अनुपमेय कीं जणुं शशित्व हो वर्णता ।
कसें मजसि दुर्बला वचनिं येइ तें वर्णितां ? ॥ ५८ ॥
स्वयें अनुपमेय हे, अनुपमेय त्या राजसा ।
प्रभा फुलुनि भोंवतीं जमत जोड जैं गोडसा ॥
स्वरूपगरिमा कसा मग वदूं तिथें भाजतो ।
तया नयनहर्षणा मनुज धन्य पाहील तो ! ॥ ५९ ॥
जिथें सकल देवता विविधदीप्तरागान्विता ।
जणूं विहरती सुखें गगनिं दीप्त जिव्हाच[1] त्या ॥
जयांतिल सरस्वतीभगवतीच स्वाहा पहा ।
असा गमत अग्निचा असत कान्तिमान् लोक हा ॥ ६० ॥

---

१, अग्निजिव्हा, ज्वाला.

जणूं विधिचिया मनीं असत सर्व सौंदर्य जें ।
कितीहि करि लोक हा तरि न पूर्ण हो व्यक्त तें ॥
म्हणोनि मग निर्मि हे सकल रंग तैसी विभा ।
प्रहर्षित जगत्पिता मग बघोनियां लोक हा ! ॥ ६१ ॥

असें बघत मी, स्वयें जवळिं तों उषा पातली ।
म्हणे मजसि – " देवता दिसत ती तुवां पाहिली ? ॥
जिला बघुनियां गमे नयनि, तापलेलें असें – ।
सुवर्ण जगिं या जणूं पवनरूप झालें असे ! ॥ ६२ ॥

जशी कवनकानना कुणिहि जावया या जगीं ।
जरी कधिंहि ये, तिथें सतत नेत त्या मीच कीं ॥
तशी कनकदेवता गणितकानना ने जनां ।
तयांसि पथदर्शिका सखिहि जाति जे त्या वना ॥ ६३ ॥

दुजी दिसतसे तिथें कमलनीलभा जीस ती ।
प्रभामय नभें असे घडियली गमे जी सती ॥
स्वयें वनिं जनांस ने सतत हीच वेदान्तिच्या ।
तयास्तवाचि येति जे सतत जाति संगें तिच्या ॥ ६४ ॥

तिथें क्षितिजिं जांभळी दिसत दिव्य देवांगना ।
सदा स्मितमुखी, जनां दिसवि गायनाच्या वना " ॥
" अये ! " पुसत मी मधें " अशिं वनें तरी गे किती ? ।
कुठें असतिं तीं ? मला नच कुठें इथें दीसतीं ? ॥ ६५ ॥

इथें दिसाति देवता सकल का सकार्याच या ? ।
सकार्य सगळ्याच या तरी वनें किती जावया " ? ॥
" असंख्य, गणती न त्यां " म्हणतसे उषा सोज्ज्वळा ।
" अजूनि नच मोजण्या कुणिहि शक्त वा, जाहला ॥६६॥

अम्हीं सतत राहतों सतत नांदतों लोकिं या ।
परी नच वनें किती अम्हिहि शक्त जाणावया ॥
जरी असतिं याच तीं सकल एक लोकावरी ।
स्वयें भगवतीविणें कुणि न जाणिलीं तीं खरीं ॥ ६७ ॥

वनेंहि किति ना कळे, कुठुनि बाल ! सर्वज्ञता ।
इथें मनुज देवही थकुनि थांबले मोजतां ! ॥
अनेकवनगामिही कुणि न, एकही ना सरे- ।
कधीं वन बघोनियां, मग अनेक कोठोनि रे ! ॥ ६८ ॥

अनंत नभ, कालही जरि अनंत कोणा कळे ।
अनंतहि विभू असें जरिहि ब्रह्म तें आकळे ॥
तरीच मग त्यास हा सकल लोक ये जाणतां ।
अजाण शिशु हे ! तया म्हणाति जाण सर्वज्ञता ॥ ६९ ॥

---

१, सरस्वतीवांचून.

अनंत, अयि बालका, असत रे असा लोक हा ।
उगा भ्रमसि कासया, स्वहित तेवढें तें पहा ॥
अतां प्रथम थांबुनी संवय तूं करीं पाहुनी ।
पुढें कवनकाननीं चल सरस्वती वंदुनी " ॥ ७० ॥

तिचें वचन हें असें श्रवणिं ऐकुनी वाटलें ।
जणों हृदय फाटलें, शिर जणों फिरों लागलें ॥
" अशक्य मज पामरा तरिच " ! मी म्हणें देविला ।
" कशी अनुमती मिळे ? वनहि कोठुनी तें मला ? " ॥ ७१ ॥

मदीय न हताशता हृदय जों असें ग्रासितें ।
क्षणीं फिरुनि धीर दे, मज उषा पुन्हां बोलते ॥
" नको भिउंसि बालका, मनिं हताश होऊं नको ।
न दे कधिं हताशता जय; प्रयत्न सोडूं नको ॥ ७२ ॥

बरोंचि सुचलें तुला; संवय तूं करीं चांगली ।
अधीं बघुनी लोक हा संवय पूर्ण जैं जाहली ॥
पुढें भगवतीचिया चरणदर्शना येइं तूं ।
तिला मग सुजाणसा सहज नीट आराधिं तूं ॥ ७३ ॥

अधीं प्रथम तोंवरी विसर सर्व शंकादिकां ।
कधींहि भय ना कुणां शुभद जाहलें बालका ! ॥
म्हणोनि भय तेविं कीं विसर सर्व शंकाहि या ।
बघें सकल लोक हा धरुनियां निजप्रत्यया ॥ ७४ ॥

करोनि मन लोकिं या सकल नीट एकाग्र रे ।
शिरें सकल लोकिं या, मुळिंहि भिन्नतेनें नुरे ॥
जणूं बनत तूंच हा सकल लोक ऐसा शिरें ।
सचित्तमनलोचनें हृदय ओत याच्यांत रे ॥ ७५ ॥

असें करिसि बालका, तुजसि येइ सिद्धी तरी ।
अतां विसर सर्वही, झटुनि नीट यत्ना करीं ॥
जसें प्रथम लोकिं या, भगवतीचियाही पुढें– ।
तदात्म करुनी मना चरणलीन होणें पडे " ॥ ७६ ॥

रुचे वचन गोड तें भगवती उषा देविचें ।
कसा न कळतां पुन्हां हृदयिं धीर ये; शांतिचें– ॥
तसोंचि हृदयीं पुन्हां सहज उद्भवे भान हो ।
पुन्हां नयनमानसें मग निरीक्षणीं गर्क हो ॥ ७७ ॥

पुन्हां नयन लोभले, मन बळेंचिं आकर्षिलें – ।
असे भवतिं त्या जगें मज सुखें पुन्हां मोहिलें ॥
पुन्हां दिसति रंग ते, कमल, देवता सोज्ज्वला ।
पुन्हांहि सकलेंद्रियीं स्फुरत लोक भासे मला ॥ ७८ ॥

सुखें भरुनि कोंदला, अति विचित्र जो पाहिला ।
समुन्नतिच वाटला बघुनि नेत्रिं साक्षात् मला ॥
असा नवल लोक तो मज पुन्हां स्फुरों लागला ।
गमे पुढति तेधवां कळतसे असे कीं मला – ॥ ७९ ॥

प्रभेपरिस सौरभें मधुर मंजु नादें तसें ।
अलंकृत असे अहो नवल लोकिं त्या सर्वसें ! ॥
नसे नवल कीं जरी कमल तें सुगंधी असे ।
परी कमल कीं तिथें मधुर गातही तें दिसे ! ॥ ८० ॥

सरीं सुरभि वारि तें ! – मधुर तेंहि गातें जणों ! ।
न गान तरि अन्य मी जगांत काय त्यातें म्हणों ? ॥
निघे मधुर नाद तो नित जलांतुनी त्या सरीं ।
परी मधुरिमा अशी – कधिं न त्रस्त कर्णा करी ! ॥८१॥

सरीं रमति, पोहती, मधुर गाति वा खेळती ।
किती तरि मनोहराकृति विलासिनींच्या तती ॥
सुगंधमय दीप्तिमान् जणुं विभाहि त्यांच्या स्वतां ।
स्वनें मधुर गाउनी रिझवि आपुली देवता ! ॥ ८२ ॥

असे सकल नाद ते मधुर एक होवोनि जैं ।
मनीं श्रवाणिंही तसे भरति जीव व्यापोनि जैं ॥
तसे घुमती जैं गमे हृदयिं चेतनेभीतरीं ।
स्वनीं विरघळोनियां गमत नाद व्हावें तरी ! ॥ ८३ ॥

जणों सकल नाद ते मिसळुनी प्रमाणामधें ।
समस्त मिळुनी निघे मधुर एक संगीत तें ।
गमे ललित बाग ही मधुरशा स्वरांची असे ।
अपूर्व, नयनापरी, श्रवणिं भान हें होतसे ॥ ८४ ॥

गमेच अथवा जिथें विविधदीप्तरागान्विता ।
अशा सकल देवता मधुर रागिणी त्या स्वतां ॥
जिथें जणुं सरस्वती प्रणवरूपिणी दुःखहा ।
असा असत लोक कीं जणुं स्वयें स्वनब्रह्म हा ॥ ८५ ॥

सुगंधमद कोंदला, सकल लोक वेडावला ।
गमे म्हणुनि धुंद तो बरळुनी बकों लागला ॥
असे सकल तेंच कीं मधुर गान हें मादक ।
मला फुगुनि[1] फोडितें, भुलुनि[2] मारितें हें सुख ! ॥ ८६ ॥

सुगंधहि न सोसवे, सुख तरी सहावें किती ! ।
असह्य सुख हें असे, खचित यास नाहीं मिती ! ॥
असह्य जरि सौख्य तें परि न त्रास थोडाहि दे ।
न त्रास जरि दे तरी, परि न सौख्य सोसेचि तें ॥८७॥

जगीं सकल भावना श्रवण, गंध, वा रूप कीं ।
जशा असति भिन्न, त्या नच तशा इथें या जगीं ॥
गमे सकल हें असे भवर्ति एक कांहीं तरी ।
अनाम, हृदयीं शिरे सकल तेंच नानापरी ॥ ८८ ॥

---

१, फुगवून. २, भुलवून.

न नाम जरि भिन्न, ना कळत आमुच्या या मना ।
म्हणोनि वदतां इथें करि सनाम त्या भावना ॥
परी मजासि हें कळे जगतिं नाम तेथें नसे ।
असे सकल जें – तुलेविण, अनाम ऐसें असे ॥ ८९ ॥

कळे न 'जग' मी म्हणूं, नच म्हणूं, अशा या जगा ।
कळे न म्हणुं 'भावना,' नच म्हणूं, कळे जें तया ॥
कळे न म्हणूं 'सौख्य' कीं नच म्हणूं मला होत या ।
अनाम परि ना कळे म्हणुनि नाम देणें तया ॥ ९० ॥

अनाम मज जें स्फुरे म्हणुं तयाप्रती काय मी ।
म्हणोनि मनिं भावुनी भवतिं सर्व तें पाहिं मी ॥
अनाम सगळेंचि तें भवतिं पाहतां पाहतां ।
अनामपद कोंदला नयनिं माझिया सर्वथा ॥ ९१ ॥

अनाममद नेत्रिं तो दिसत, ऐकुं ये कानिं तो ।
अनाममद वाटतें मजासि बाह्यतां स्पर्शतो ॥
अनाममद गंध तो; हृदयिं तोचि भासे मला ।
जणूं कुणि विचित्रसा सुखसमुद्र हेलावला ! ॥ ९२ ॥

"अये भगवती उषे," म्हणत मी तिला हर्षुनी ।
'अनाममद' हें कळे मजासि येथ ध्यानीं मनीं ॥
अतां मज असें दिसे, असत काय गे नीट हें ? ।
चुकें अजुनि काय मी ? कळत वा मला नीट हें ? " ॥९३॥

असें वदत, पाहि ना वच तिला कसें वाटलें ।
जिथें असत शारदा नयन त्या दिशे लागले ॥
अनाममदकेंद्र ती गमत, धुंद मी पाहतों ।
न कारण तरी तिथें गमत जीव हा ओढतो ॥ ९४ ॥

अहेतुक असा जई अति तटस्थ मी पाहतों ।
अनाममद देहिं तों हृदयिं बाहिरीं खेळतो ॥
मदीय शिरिं तैं तिनें कर विलोल हो ठेविला ।
म्हणे मज मृदुस्वरें मग तदा उषा प्रेमला ॥ ९५ ॥

"अनाममदभान हें जरि तुला असे लाभलें ।
तरी सुजन बालका ! सकल कार्य रे जाहलें ॥
अनाममद, बालका ! असत शारदाऽनंद हा ।
अतां चल, सरस्वती बघ स्वयें जगदुःखहा ॥ ९६ ॥

जगीं भगवतीचिया मृदु तदीय निःश्वास हा — ।
अनाममद सर्वतां पसरला पहा बाल ! हा ॥
अनाममदभान हें जरि तुला असे जाहलें ।
तरी सुजन बालका ! सुकृत सर्व रे पांडलें ॥ ९७ ॥

---

१, विद्याऽनंद. २, पाडाला आलें.

उगा उशिर कां अतां ? चल सरस्वतीदर्शना ।
मिळेल तुज वाटतें अनुमतीच जाण्या वना ’ ॥
“ तथास्तु ” म्हणुनी मनीं, बहुत हर्षुनी, काढिली – ।
सरस्वतिवरोनियां स्तिमित दृष्टि मीं आपुली ॥ ९८ ॥
पुन्हां भगवती उषा नयनिं धन्य ती पाहिली ।
जिचा सुखद रंग तो बघुनि शांतिही लाजली ! ॥
पुन्हां वदनचंद्रमा मृदु सहास तो पाहिला ।
बघोनि मनिं वाटलें फिरुनि शुद्ध आली मला ॥ ९९ ॥
“ सये, ” तिजासि मी म्हणें “ मज सरस्वतीदर्शना ।
अतां जरिहि नेशि, ने, परि गमे तुझ्या गे मना – ॥
अतां खचित कीं न मी कधिं असाचि तेथें अतां – ।
बकेन भलतेंच कीं करिन कांहिं वा मूर्खता ? ॥ १०० ॥
सये ! स्मरण ठेविं गे जरि चुकें नमस्कार मी ।
मला करुनि दाविं कीं ‘ लवुनि तेथ ऐसा नमी ’ ॥
चुकोनि भलतेंच मी जरि करीन बोलेन वा ।
तरीहि कथिशील वा मजासि सांवरोनी न वा ? ॥१०१॥
दयाळ असशी सये ! मजसि भीक दे येवढी ।
असें शि १ विं कीं मला मुळिं न चूक हो येवढी ॥
कसेंहि करुनी दया करिल देवि ऐसें करीं ।
त्वदीय विसरेन मी उपकृती न जन्मावरी ॥ १०२ ॥

---

१, यत्किंचित् देखील.

न तों जग न, लोक हा नच, न काव्यकान्तारही।
अशी स्थिति; नको मला मग गमेल हा जीवही ॥
"पुरे" म्हणत सुंदरी "खचित भ्याड आहेस गा।
सजे न परि भीति त्या मनुज येत जो या जगा ॥१०३॥

त्यजीं भय मनांतलें सकल; नाहिं तें त्यागिलें।
तरी खचित ती दशा भय जिचें तुला दाटलें ॥
असे अभयलोक हा, त्यजिसि भीति ना तूं इथें।
तरी समज रे तुझें असत नष्ट सर्वस्व तें ॥ १०४ ॥

अतां फिरुनिया मना स्थिर करी अनामावरीं।
त्यजी भयहि, शांत हो, दृढ विचार घे अंतरीं – ॥
'अतां भगवतीस मी बघिन, शांत राहीन मी।
स्तवीन तिज नीट मी,' तिजसि नीट ऐसा नमीं" ॥१०५॥

असें वदुनि दाविते करुनियां नमस्कार ती।
कसेंहि मधुराऽकृती करिति त्या तरी शोभती ॥
"त्यजीन भय" मी म्हणें "जवळिं राहिं गे तूं परी।
जरी जवळिं तूं तरी मजसि धीर ये अंतरीं" ॥ १०६ ॥

"बरें, चल," म्हणे मला भगवती उषा कोमला।
"असा मजसवें चलें, जवळि नीट नेतें तुला ॥
अतां परि भिऊं नको. जपुनी बोल तेथें जरा।
न फार, भलतेंहि ना, वद असें" म्हणे सुंदरा ॥ १०७ ॥

निर्घे मग तिचे सवें, मृदु जळांतुनी चालतों ।
न भीति, परि अंतरीं खचित धाक हो वाटतो ॥
कळे न हृदयीं कसें तरिहि कालवे वाटतें ।
अशा स्थितिंत चाललों तिजसवें जलीं वाट ते ॥ १०८॥

---

पूर्वखंड समाप्त.

---

‘ काव्यकान्तार ’ काव्य अपूर्ण.

# इतर कांहीं कविता.

# नवीन धर्मावताराची चूर्णिका. *

आनंदानें हृदय उचंबळून सोडणारा रमणीय उषःकाल नुकताच संपत होता व नयनमनोहर अरुणोदय होणार होता – किंबहुना झालाच होता; व साधकाला होणाऱ्या आत्म्याच्या भानाप्रमाणें नयनांना अनंत सृष्टि दिसते–दिसतेशी भासत होती व अनंत सृष्टीला भगवान् भास्कर उगवतो–उगवतोसा भासत होता. अशा वेळीं एका अतिशय डोंगराळ प्रदेशांतील एका अति उंच टेंकडीवर एक मनुष्य अगदीं एकटा उभा होता. त्याच्या अंगांत पांढरा स्वच्छ घेरदार अंगरखा होता, पायांत तसलीच एक स्वच्छ तुमान होती, खालीं लाल भडक चढाव होता. जुन्या काळच्या भाटांप्रमाणें त्यानें कमरेला भरजरीचा शेला बांधलेला होता. त्या मनुष्यानें ऐटबाज कल्ले राखलेले होते व डोक्यावर अरुणोदयाच्याच रंगाची एक पिळदार पगडी घातलेली होती. स्वतःच्या धिप्पाड व मजबूत बांध्याला साजेल अशी त्याच्या हातीं एक उंच काठी होती. कांहीं तरी विलक्षण विचार मनांत घोळत असावा असें वाटण्याजोगी त्याची त्या वेळीं मुद्रा होती. एकाएकीं मनांत कांहीं विचार येऊन त्यानें एकदां वर, तेज दाटून फुटूं पाहणाऱ्या पूर्व दिशेकडे पाहिलें–

---

* मराठी थिऑसॉफिकल् फेडरेशनच्या विद्यमानें पुण्यास निघणाऱ्या "धर्मजागृति" मासिकाच्या मे १९१४ च्या अंकांत ही कविता पूर्वी प्रसिद्ध झालेली आहे.

तेजाच्या लखलखाटांत सर्व लहान तारे मावळले होते, पण गुरूचा दैदीप्यमान तारा त्याही वेळीं त्या तेजाचे वर आकाशांत एकटा चमकत होता! त्या पुरुषानें एकदां विलक्षण दृष्टीनें त्या ताऱ्याकडे पाहिलें, एकदां त्या उजळ पूर्व दिशेकडे पाहिलें, एकदम चेहऱ्यावरचा भाव बदलून वरील नीलाकाशाकडे पाहिलें व अति शांत, अति गंभीर व परम कारुणिक दृष्टीनें एकदां टेंकडीच्या खालीं पसरलेल्या अफाट व विस्तीर्ण जगताकडे पाहिलें. एकाएकीं त्याच्या चेहऱ्यावरचा भाव बदलला. रणांगणावर समशेर गाजवून विजयश्रीची माळ हक्कानें व डौलानें गळ्यांत रुळवीत बेगुमानपणानें जग तुडवीत चालणाऱ्या उद्दाम समरवीराच्या डोळ्यांतील विलक्षण चमक एकदम त्याच्या डोळ्यांत झळकली. झटक्यासरसें त्यानें पुन्हां एकदां वर लखलखणाऱ्या पूर्व दिशेकडे पाहिलें, त्या लखलखणाऱ्या ताऱ्याकडे पाहिलें, वरच्या अनंत नीलाकाशाकडे पाहिलें—त्याच्या अंगावर थरारून रोमांच आले! त्याचा बलिष्ठ देह एकदां नखशिखांत कांपला; व काय वाटून कोण जाणे, त्यानें आपल्या हातांतील उंच काठी जवळच्या एका मोठ्या पाषाणावर टेंकली व त्यावर चपलतेनें उडी मारून, डोळ्यांत अपूर्व तेज चमकणाऱ्या त्या धिप्पाड पुरुषानें आपल्या खड्या व खणखणीत आवाजांत पुढील चूर्णिका म्हटली. ती ऐकून मला काय वाटलें असेल तें माझें मलाच माहीत. मी जशी ऐकली तशीच ती येथें सादर करीत आहें:—

( वृत्त—भाटांचें मोठें कवीत. )

जयजयकार महाराज !—

तुंग नभ भंगुनी, स्वर्ग उल्लंघुनी,
गगन हें भेदुनी, शब्द आला ।
' धर्म जो रक्षितो, नीति सांभाळितो,
ज्ञानमार्तंड तो, जवळि आला ! ' ॥
स्वार आले पुढें, जगतिं जीं सांकडें,
मार्गि आलीं पुढें, वारण्याला ।
गगन हें गर्जतें, धरणि ही बोलते,
' धर्ममार्तंड तो जवळिं आला ' ! ॥ १ ॥

ध्वांत विध्वंसि जो, दुःखभय नाशि जो,
पुनरपी एक तो दिवस आला ।
कांहिं जगतांतले, थोर जन जागले,
सामुरे जाहले, घ्यावयाला ॥
अजुनि रे निजुं नका, ज्ञानरविचा टिका ।
उमटतो नेटका गगनभाला ।
जागृही, जागृही ! लोकहो सर्वही,
ज्ञानमार्तंड तो उदयिं आला ! ॥ २ ॥

पैस हे लोकहो !, पैस सृष्टीसखे !,
पैस आत्म्या उभा शांत राहे ।

टाप ही वाजते, दल पुढें चालतें,
ज्ञानसम्राट्प्रभू पातलाहे ! ॥
पैस हे ध्यांत रे, पैस हृदया गडे,
पैस रे मानसा, स्वस्थ राहे ।
टाप ही वाजते, दल पुढें चालतें,
ज्ञानसम्राट्प्रभू पातलाहे ! ॥ ३ ॥

दुंदुभी गरजला, ही ध्वजा फडकली,
बीनेही[1] धडकली, स्वारि आली ! ।
जगत रे जागृही, स्वारि आलीच ही,
शिंग हें वाजतें, स्वारि आली ! ॥
अंगणें झाडुनी, कुंकुमें सिंचुनी,
तोरणें लावुनी, जगत सजवा ।
वाद्य जें जें असे, मंजु मंगल जगीं,
सर्व तीं अंगणीं, सज्ज ठेवा ॥ ४ ॥

भक्ति भगिनी गडे, घालि अंगणिं सडे,
पर्व हें केवढें, आज आलें ।
पाहि गे पाहि गे, ह्या उषःकालिं हें,
उजळ तेजामधें विश्व न्हालें ॥

---

१, ‘ बिनी ’ ही म्हणतात. सैन्याची अघाडी.

शुभ अशा या क्षणीं, न्हावुनी माखुनी,
त्यासि ओवाळण्या सज्ज होईं ।
ऊठ गे भामिनी, प्रेमघृत घालुनी,
लावुनि निरंजनी, हातिं ठेवीं ॥ ५ ॥

स्नान उरकोनियां, तिलक लावोनियां,
शुद्ध होवोनियां सिद्ध व्हा हो ।
पर्ण देवोनियां, पुष्प वाहूनियां,
भक्तिनें वंदुनी, धन्य व्हा हो ॥
ज्ञानरवि हा असा, ना दिसे फारसा,
उदय फारां दिसां, त्यासि येतो ।
नयन झाकूं नका, श्रवण रोधूं नका,
ज्ञानरवि हा पहा उदयिं येतो ॥ ६ ॥

सत्प्रभा फांकली, पूर्व दिक् उजळली,
मंजु खगमंडळी गाउं लागे ।
गंधयुत मंद हा, वायु वाहे पहा,
शांतिसंदेश हा, स्पष्ट सांगे ॥
‘ शीत जो संहरी, ध्वांतगजकेसरी,
पुनरपी तो हरी, येत आहे ’ ।
जागृही जागृही ! लोक हो सर्वही,
ज्ञानमार्तंड तो, उगवताहे ॥ ७ ॥

पूर्वि जरि येत तो, मागुनी उमगतो,
आधिं आतां झडे, म्हणुनि डंका ।
नयन हे झांकुनी, श्रवणही बांधुनी,
थोरवी दावुनी काय शंका? ॥
नयन उघडोनियां, कर्ण देवोनियां,
हट्ट सोडोनियां, नीट देखा — ।
पातला महितला, त्या जगन्मंगला,
ज्ञानधर्मासि जो, पाठिराखा ॥ ८ ॥

[ २ ]

जयजयकार महाराज !—

एक रवि ज्यापरी, नित्य तम संहरी,
एक रवि त्यापरी ज्ञान देतो ।
रजनि जाते मधें, बिंब नव भासतें;
ओळखूं ये न कीं, एक हा तो ॥
येत परि तोचि तो, जाणत्यां उमगतो,
वचन त्यांचें तरी, सत्य माना ।
भिन्न देशांमधें, भिन्न कालांमधें,
एक रवि तळपतो, ज्ञानराणा ॥ ९ ॥

भिन्न देशांमधें, भिन्न कालांमधें,
भिन्न जनतेमधें, भिन्न भासे ।

भिन्न आकाश, तें त्यामुळें भासतें;
बिंब परि तेंचि तें नित्य विकसे ॥
पूज्य रवि कालचा, त्याज्य रवि आजचा,
पूज्य येथें रवी, तेथ नोहे ।
काय ऐसें कधीं, सुज्ञ बोले सुधी,
हट्ट हा अंधसा काय नोहे ? ॥ १० ॥

व्यर्थ निंदूं नका, नीट हें आयका,
पाहुनी मागुनी कांहिं बोला ।
काल नच संपला; पूर्वि जें जाहलें,
काय बाधा पुन्हा व्हावयाला ? ॥
काल अति लोपला, काळ अति राहिला
आजही हा मधें काळ आहे ।
पूर्वि कालामधें, आज कालामधें,
व्हावया बाध कां तोंचि आहे ? ॥ ११ ॥

सूर्य नाहीं नवा, चंद्र नाहीं नवा,
गगनही हें नवें आज नाहीं ।
तारका नच नव्या, नाहिं आत्मा नवा;
ज्ञानरवि हा तसा नविन नाहीं ॥
वर्तमानाप्रती नित्य जन दूषिती,
लोटतां तोचि परि गोड गमतो ।

दूरचें नच दिसे, जवळिचें दिसतसे,
काल परि सारखा नित्य असतो ॥ १२ ॥

[ ३ ]

जयजयकार महाराज !—

दास हो एक व्हा, नौबती वाजवा,
जगत हें हालवा घोर नादें ! ।
भेरि फुंका अतां, भेरि फुंका अतां,
भेरि फुंका अतां, थोर मोदें ! ॥
दुमदुमो दुंदुभी, गगन भेदूनियां,
जगतही थोडकें आज जागो ।
कीं रवी तो पुन्हा आज येतो जगा,
हें असें या जनां वाटुं लागो ! ॥ १३ ॥

युद्ध होई तरी युद्धही होउं द्या;
युद्ध होणार हें निश्चयानें ।
दार्ढ्य सोडूं नका, घाइही करूं नका,
स्वस्थ परि बसुं नका खिन्नतेनें ॥
शांति नच सोडितां, डंक हा वाजवा,
दशदिशा भेदुनी डंक जावो ! ।
येत जंव तो रवी, येत तो या महीं,
येवढें तंव तरी ख्यात होवो ! ॥ १४ ॥

बाण सतिचें करीं आज अम्हि घेतलें,
प्राण गेले तरी प्राण देऊं ।
नाथ तो आमुचा कधिं न परि सोडितां,
ब्रीदही आमुचें शुद्ध ठेवूं ॥
जग हंसो, जग छळो, दुःख देवो अम्हां –
दुःखही सोसणें भाग्य आहे – ।
जगहितासाठिं परि सांगुं हें निशिदिनीं,
कीं 'पुन्हां ज्ञानरवि उगवताहे' ॥ १५ ॥

नाहिं दुःखाप्रती भीत आमुची मती;
दुःख कोणासि रे नाहिं झालें ? ।
नाहिं सकलांसि परि भाग्य हें लाभलें,
अम्हि हें जेविं जाहीर केलें ॥
कीं 'रवी येत रे, ज्ञानरवि येत रे,
जीवनें कीं मनें शुद्ध राखा' ।
मान हा आमुचा; दुःख द्याहो किती,
देव आहे अम्हां, पाठिराखा ! ॥ १६ ॥

कष्ट सोसूं अम्ही, दुःख सोसूं अम्ही,
जगतिं उपहासही सहज सोसूं ।
यातना सर्वही, त्याचिया कारणें,
शांत चित्तें अम्ही सहज सोसूं ॥

सांगतों परि तुला – सांगण्या पातलों,
ऐक बारे जगा! मुक्तकर्णीं।
‘ ज्ञानरात्रि पातला, जवळिं रे पातला,
चाललों हें पहा, बीन आम्हीं ’ ॥ १७ ॥

[ ४ ]

जयजयकार महाराज !—

तव न कधिं चांगुलें, मम न कधिं वांगुलें,
हाच जगतांमधें न्याय झाला।
शब्द ते राहिले, फारही माजले,
सत्य परि लोपलें – अर्थ गेला! ॥
कोणि नच पाहतो – “ काय मी हें बकें,”
“ हें जुनें ” म्हणुनियां तृप्ति त्याला।
ऐसी महाभाग! झाली अवस्था,
अतां कोण छेदी तुझेंविण इजला? ॥ १८ ॥

कितीही भलें तें, नवें त्याज्य वाटे,
स्वतंत्रा विचारा करी ना कुणी।
आज जगतांमधें शांति नाहीं कुठें,
कलह जेथें तिथें येत कानीं ॥
प्रश्न अति जाहले, उत्तरें संपलीं;
मनुजकृतिची अतां हद्द झाली।

तूं न येतां विभो ! सोडवी प्रश्न हे,
कोण आतां वदे अंशुमाली ? ॥ १९ ॥

[ ५ ]

जयजयकार महाराज !—

देवदेवांप्रती वंद्य जो संमती,
योगमायापती ज्ञानसूर्या ! ।
या पुन्हा या पुन्हा, ह्या जगा या पुन्हां
चरणरजदर्शना आज द्याया ॥
पूर्वि नच पाहिले, कोण जाणे पुढें,
पाय ते आपुले, आज दावा ।
एकदां पाहुनी, अश्रुजळ वाहुनी,
धन्य वाटे मनीं जीव व्हावा ! ॥ २० ॥
गिरिगिरीभीतरीं सकल महिचे वरी,
सर्व द्विज थांबले अर्घ्य द्याया ।
हीन आम्ही तिथें, दीन हे बापुडे,
आमुचा त्यांपुढें काय केवा ! ॥
येसि बा तूं परी आमुचेसाठिं गा,
धन्य आम्ही तुला पाहणारे ।
तूंचि बा शक्ति दे, तूंचि बा कार्य घे,
जागवीं लोक हे झोंपणारे ॥ २१ ॥

शातता यो पुन्हां, शुद्धता यो पुन्हां,
प्रेम येवो पुन्हां, पूर्वकालीं— ।
व्यास जैं येत तें, बुद्ध जैं येत तैं,
कृष्ण जैं येत तैं, जेविं आलीं ॥
प्रेम जनिं वाढलें, त्यागि जन जाहले,
स्वार्थ खल हारला कांहिं काल ।
हे विभो ! तेविं हो, जगत निस्स्वार्थि हो,
यो दया मागुती सर्वकाल ! ॥ २२ ॥

शेवटीं विनवितों येवढें तुजप्रती,
शीघ्र दावीं अतां, पाय बा ते ।
धन्य नर पाहुनी, धन्य रवि दावुनी,
धन्य तिज लागुनी धरणि होते ॥
धन्य ज्यां लागुनी वायु होतो जनीं,
धन्य जल ज्यांप्रती धुवुनि होतें ।
धन्य आकाश तें, मूर्ति ती धरित जें,
पुण्यपद हे विभो, दाविं बा शीघ्र ते ॥ २३ ॥

[ ६ ]

जयजयकार महाराज !—

जगिं, दयाळा, परी दुष्टतेची सुरी,
अणुअणूंच्या वरी ठेविलीसे ।

कंटकांच्यामुळें जगत हें कोंदलें; ।
पाय ते कोवळे पाहुं कैसे – ॥
कंटकीं ठेविले, कंटकीं कष्टले;
त्याहुनी हे भले प्राण गेले ! ।
शेषशायिन् ! नको, पाहणें तें नको,
लाल मृदु पाय ते कष्टलेले ! ॥ २४ ॥

जगतिं जें भाजलें, रुधिरही टपकलें,
उदयिं तव हरिखलें, अधिर झालें ।
हृदय माझें असें, उमललें कमलसें,
त्यावरी कोवळे, पाय अपुले– ॥
आधिं ठेवीं विभो, जपुनियां जगतिं ये,
चाल मग हळुहळू हृदयमार्गें ।
आज जगतामधें जाळल्यापोळल्या
सकल हृदयां तुझी आस लागे ! ॥ २५ ॥

[ ७ ]

जयजयकार महाराज !—

येत तूं ऐकुनी, बुद्धिनें शोधुनी,
येत तूं पाहतां हर्षयोगें – ।
मत्त जो जाहला, मार्गिं जो लागला,
जाउं जो पाहतो कर्मयोगें ॥

वाट पाहे तुझी, आस नाहीं दुजी,
कार्य करण्या तुझें सिद्ध झाला ।
एक जन दीन हा, दास तव लीन हा,
भाट बलवंत हा, कवन तव गायिला ॥ २६ ॥

# लपलेला गंधर्व *

( वृत्त—शार्दूलविक्रीडित )

कोणाचें अति दूर गान मजला हें ऐकुं येतें बरें ? ।
आहे भासचि, कीं तिथें बसुनियां हें गात कोणी खरें ? ॥
गाणें हें, बसुनी इथें उगिच कां, हा निर्जनीं गातसे ? ।
कां हें ऐकुनिही मला गमत कीं 'आकर्षि मातें' असें ? ॥१॥

येथें तो जरिही असेल बसला गाणें उगें छेडित ।
येथें निर्जनिं व्यर्थ काय नकळे गाऊनि त्या लाभत ॥
माझेकारण मानुं मी जरि असा हा गात तेथें बसे ।
कां हा दूरचि निर्जनीं तरि असा कीं एकला गातसे ? ॥२॥

माझेकारण गात तो जरि असे, कां दूर ऐसा बसे ? ।
माझेकारण हें नसेल तरि हें गाणें कशाला असे ? ॥
माझेवांचुनि येथ कोणिच नसे, मी ऐकितों एकला ।
कोणाहीकरितां नसेल तरि कां हा ऐकुं देतो मला ? ॥३॥

माझेकारण हें असेल तरि कां हा दूर गातो असा ? ।
माझेसन्निध बैसुनी नच मला कां ऐकुं दे नीटसा ? ॥

---

* "धर्मजागृती"च्या आगस्ट १९१४ च्या अंकांत ही कविता पूर्वी प्रसिद्ध झाली आहे.

गाणाऱ्या ! वद कोण तूं, कुठुनि वा आलासि तूं केवि रे।
गातो कां भुलवी मला परि गमे अस्पष्ट जें ऐकुं ये? ॥४॥

मातें हें न सहे; गड्या, जवळि तूं येऊनियां गा तरी।
किंवा मोहुं नको मला; निवडुनी तूं एक कांहीं करीं॥
कोठें ना दिसशी कुठें तरि तुला शोधूं मला ना कळे।
ये गाणें श्रवणीं परी नच दिशा त्याचीहि मातें मिळे ॥५॥

ऐसा त्रास नको नको, प्रिय सख्या, देऊं नको रे मला।
आतां ऐकुनि गान मोहुनि सख्या, हा जीव वेडावला॥
भेटी दे, मज दाखवीं लपुनियां कोठूनि गाशी असा।
किंवा मारुनि जाळुनी करिं मला वा तूंचि रे नाहिंसा! ॥६॥

ऐसें गायन ऐकुनी नच कळे हें कोण गातो जरी।
आहे त्याहुनिही बरेंचि जळणें, तीं मृत्युदुःखें बरीं! ॥
ध्यानीं ठेविन हेंचि कार्य पुढतीं, गाणार शोधीन मी।
कष्टा सोसुनिही परी कधिं तरी गाणार पाहीन मी! ॥७॥

# भोवऱ्याचा खेळ *

## प्रथम परिच्छेद

(चाल—वधू ही वल्ली.)

भोवरेवाला । जोउनी कुठें तो लपला ॥ ध्रु० ॥
भोवरा फेंकिति एक गुणानें ।
फेंकि भोवरा हा त्रिगुणानें ।
कैसा फिरला तीन गुणानें ।
बंदहि न झाला,
ठरवितो सान हा काला ॥ १ ॥
कधीं फेंकिला, कुठुनि फेंकिला ।
उभा कुठें तो तई राहिला ।
तीन गुणांनीं कसा फिरविला ।

---

* "धर्मजागृती" च्या डिसेंबर १९१२ च्या अंकांत ही कविता पूर्वी प्रसिद्ध झाली आहे.

१, पाठभेद—"दावा हो कुणि तो मजला." हें गाणें ज्यांना केवळ भक्तिपरच करून म्हणावेंसें वाटेल त्यांस हा पाठभेद प्रिय वाटण्याजोगा वाटला म्हणून येथें दिला आहे.

प्रश्नमय झाला,
पाहुनी जीव ही लीला ॥ २ ॥

कशासाठिं हा तयें फिरविला ।
लीलेविण कां न गमे त्याला ।
फेंकुनि गमलें काय तयाला ।
हर्षयुत झाला,
काय तो सुखें तैं हंसला ॥ ३ ॥

कधिं न भोंवरा डळमळला हा ।
स्थिरगति राही नित्य कसा हा ।
स्थान कुठें खालीं भवऱ्या या ।
कुणीं फेंकीला,
जाउनी कुठें तो लपला ॥ ४ ॥

जरि लपणें, कां खेळ मांडिला ।
खेळ मांडिला, तरि कां लपला ।
खेळ सोडुनी कां हो गेला ।
खचित कां गेला,
आपुल्या त्यजुनि खेळाला ॥ ५ ॥

भोंवरा न हा अजुनि थांबला ।
किति दिवसांस्तव गति ही याला ।
जाइल गति जें ही विलयाला ।

कुठें मग याला,
   स्थल असे स्वस्थ पडण्याला ॥ ६ ॥

पृथ्वि भोंवरा, चंद्र भोंवरा ।
तारा भवरा, सूर्य भोंवरा ।
भवहि भोंवरा, कर्म भोंवरा ।
भ्रमवि सकळांला,
   परि स्वयें अचल राहीला ॥ ७ ॥

[ २ ]

हिमालयाच्या शुभ्र शेखरीं ।
घोर तपस्या धीर जो करी ।
मोहि तयाला उमासुंदरी ।
तिला वश झाला,
   दिसत कां न तो आम्हांला ॥ ८ ॥

सीतेसाठीं वनें हिंडला ।
राजा होउनि पाळि जगाला ।
विरहें ज्याच्या दशरथ मेला ।
कुठें तो गेला,
   सोडुनी दीन जगताला ॥ ९ ॥

बरा एकदां उखळिं बांधिला ।
जगा यशोदे, तुवां सोडिला ।
तुवां सोडिला म्हणुनि पळाला ।
अतां तो गेला,
घात त्वां यशोदे, केला ॥ १० ॥

गीता पार्थाप्रति जो वदला ।
मित्र सुदाम्याप्रतिही झाला ।
टाकुनि आम्हां दीन जनांला ।
अतां कां गेला,
जो जगा तारण्या आला ॥ ११ ॥

म्हणति एकदां गोकुळिं आला ।
गोपीसंगें रास खेळला ।
टाकुनि कां हो आम्हां गेला ।
भाग्यहीनांला,
गोड तो कन्हैया लाला ॥ १२ ॥

[ ३ ]

भोवरेवाल्या, थांब जरा रे ।
खेळ तुझा हा पाहूं दे रे ।
कसा खेळ हा, कसे भोवरे ।

याहि नयनांला,
पाहुं दे चंड ही लीला ॥ १३ ॥

खेळ भोंवतीं सर्व चालला ।
न कळे भवरा, न कळे लीला ।
नवल सकल हें नयनमनांला[1] ।
खेळ खेळीला,
खेळाडू परि तो लपला ॥ १४ ॥

विश्वाचा हा खेळ चालला ।
हंसवी कोणा, रडवि कुणाला ।
आदिहि नाहीं, अंत न याला ।
कशी ही लीला,
कोण हें असें खेळीला ॥ १५ ॥

विश्वपाळण्या झोंके देई ।
दिसते नच हो परि ती आई ।
पाळणा परी झोंके घेई ।
तया मातेला,
भेटवा कुणी या बाला ॥ १६ ॥

---

१, नयन व मन ह्यांना.

वृक्षालागीं दोल बांधिला ।
दिसेनाचसा वृक्ष जाहला ।
झोंके परि येती दोलाला ।
कुठें बांधीला,
वृक्ष तो काय हो झाला ॥ १७ ॥

[ ४ ]

म्हणती शब्दातीत राहिला ।
स्वयेंचि नच का शब्द जाहला ।
आपण अपुले अतीत झाला ।
कसा हो झाला,
सांगा हो कशि ही लीला ॥ १८ ॥

कुणी मानिती या सहचारिणी ।
माया नामें विश्वकारिणी ।
दोघे निर्मिति, अनादि दोन्ही ।
अनादी कैसे,
दोघेही नकळे मजला ॥ १९ ॥

कुणी बोलती मूर्त निराळा ।
तटस्थ आपण दुजा राहिला ।
गती तेथुनी दे विश्वाला ।

कुठें राहीला,
    चाळितो केविं सूत्रांला ॥ २० ॥

कुणी म्हणे तो स्वयेंचि नटला ।
स्वयें भोंवरा, स्वयेंचि लीला ।
स्वयेंचि गुणही, स्वयें फिरविला ।
कशी ही लीला,
    कोण हें केविं खेळीला ॥ २१ ॥

---

## द्वितीय परिच्छेद

( चाल—वधू ही वल्ली. )

भोंवरेवाला । खेळांत गर्क हा झाला ॥ ध्रु० ॥
जें जें 'आहे' तें तें झाला ।
सृष्टीरूपें आम्हां दिसला ।
तरि तो आम्हां वाटे लपला ।
मनुजबुद्धीला,
    चकवितो भोंवरेवाला ॥ १ ॥

अस्तित्वाची भूमी केली ।
स्थलकण त्यावरि वाळु टाकिली ।
काल-जवानिका[1] वरी सोडिली ।
फेंकि भवऱ्याला,
पटसन्मुख भवरा आला ॥ २ ॥
भवरा आला, खेळहि दिसला ।
नानापरिनें फिरुनि खेळला ।
एकाचि नानापरिनें गमला ।
फिरुनि तो गेला,
नाहिंसा भोवरा झाला ॥ ३ ॥
भवरा जातो पटामागुती ।
न कळे आम्हां मग त्याची स्थिति ।
आपण आहे पटामागुती ।
ओढि भवऱ्याला,
पट सारुनि भवरा गेला ॥ ४ ॥

[ २ ]

आपण प्राची, रविही सजला ।
उंच पर्वतीं सानु जाहला ।
तेथुनि उदया पाहे अपुल्या ।

१ नाटकाचा पडदा.

अशी नटलीला,
   खेळतो भोवरेवाला ॥ ५ ॥

प्रकाश झाला, छाया झाला ।
वस्तु ठेविली मधें मजेला ।
रवि धरण्या धांवे छायेला ।
लपंडावाला,
   खेळतो भोवरेवाला ॥ ६ ॥

तारे जुळुनी रवि तो होतो ।
रवि फुटुनी तो तारे नटतो ।
भासवि आम्हां कीं ' मी जातों ' ।
गगनिं परी राही,
   चकवुनी भोवरेवाला ॥ ७ ॥

गगनपटावरि चंद्र चित्रितो ।
पुन्हाहि पुशितो, पुन्हा काढितो ।
लहान मोठा पुन्हा रेखितो ।
निश्चय न झाला,
   भासवी भोवरेवाला ॥ ८ ॥

जडांधकारा आधिं निर्मिलें ।
चैतन्याचे दिवे उजाळिले ।
लहान मोठें त्यांतही केलें ।

दिवाळी खेळे,
रंगेल भोवरेवाला ॥ ९ ॥
प्रेमाकर्षण दोरा केला ।
विश्वाचा या पतंग केला ।
आकाशीं तो उंच उडविला ।
तळीं राहीला,
स्मितमुखी भोवरेवाला ॥ १० ॥
सृष्टिवन्हि तो स्वयेंचि झाला ।
सृष्टिवन्हिचें इंधन झाला ।
क्रिया ज्वलन जी तीही झाला ।
पेटवी त्याला,
फुंकुनी भोवरेवाला ॥ ११ ॥
विश्वमृगजला रवि तो झाला ।
मृगजलरूपें तोचि भासला ।
फसे मृगजला मृग तो झाला ।
मौज बघण्याला,
साक्षीहि भोवरेवाला ॥ १२ ॥

[ ३ ]

भोवरेवाला कसा खेळला ।
मती कल्पितां कुंठे त्याला ।

बघतां बघतां भ्रम चित्ताला ।
कठिण ही लीला,
एकला सहज खेळीला ॥ १३ ॥

'अनादि' म्हणतां 'आदि' न त्याला ।
'आहे' म्हणतां 'आदि' लागला ।
'आदि' वांचुनी 'आहे' झाला ।
अशी ही लीला,
एकला तोचि खेळीला ॥ १४ ॥

कालाविण आरंभ तयाला ।
आरंभाविण 'आहे' झाला ।
असुनी स्थित्यंतर नच त्याला ।
काळ कालाला,
गारुड अशी ही लीला ॥ १५ ॥

दिशेपलिकडे दूर पसरला ।
स्थलासिही आधार जाहला ।
स्थलाविणें तो स्वयें राहिला ।
साजते त्याला,
ही अशी गारुडी लीला ॥ १६ ॥

छळें जगाच्या जगा त्रासला ।
किंवा कळुनी मनिं जो विटला ।
या जगाताच्या फोलपणाला ।
अशा मनुजाला,
विश्रांति भोवरेवाला ॥ १७ ॥

---

द्वितीय परिच्छेद समाप्त.

---

" भोवऱ्याचा खेळ " अपूर्ण.

# द्वैतांची फुगडी

फुगडी रंगलि चोहिंकडे । फुगडीविण ना कांहिं घडे ॥
फुगडीचें मज वेड जडे । चल, आपणही खेळुं गडे ॥ध्रु०॥

एकामेकांतें धरितीं । द्वैतें जगतीं वागडतीं ॥
ग्रंथि करांची दृढ देती । परस्परां ओढुनि धरितीं ॥
चक्राकारें मग फिरतीं । भ्रमतीं, दुसऱ्या भ्रमवीतीं ॥
रमतिं, गड्याला रमवीतीं । मनुजमनाही भ्रमवीतीं ॥

जन्ममृत्युची,
जडाऽजडांची,
सुखदुःखांची,

फुगडी हो खुलली फुगडी । मनुजमनाला करि वेडी ॥
परी ज्ञान ही मधें कडी । फुगडीला 'तूं-मी' च गडी ॥ १ ॥

कुणा कल्पना ही सुचली । कुणीं सुरू फुगडी केली ॥
कशी सुरू फुगडी झाली । काशास्तव हा सुरु झाली ॥
उगिच सुरू तरि कां झाली । तुलामला कां आवडली ॥
केविं गुंतलों खेळांत । सांपडलों या फुगडींत ॥

जरि सांपडलों,
तरि कां रमलों,
रमतां भ्रमलों,

आतां यत्नें थांबे ना । कशी थांबवूं उमजे ना ॥
तुला मला भ्रमवी फुगडी । फुगडीला ' तूं–मी 'च गडी ॥२॥

तुला मला भ्रमवी फुगडी । किती शोभते ही जोडी ! ॥
" तूं " म्हणतां मी अज्ञ ठरे । मलाहि तूं " तूं " म्हणशी रे ॥
आणिक याहुनी सरस अशी । मिळेल जोडी विश्विं कशी ! ॥
परस्परां आपण धरुं या । विश्वभरीं मग खेळूं या ॥

धरिं मी तुजला,
तूं धरिं मजला,
जोड साधला !

आतां थकलों तरि खेळूं । रडतां हंसतां फेर धरूं ॥
विश्वभरीं जरि ही फुगडी । फुगडीला 'तूं–मी' च गडी ! ॥३॥

दोरी एकचि ती असते । टोंकीं दोन परी सरते ॥
तशी 'भावना' एकचि ती[1] । 'बाह्यस्पर्श' जगीं वसती ॥
दोन परी नांवें वेरिते । एकचि दों टोंकीं असते ॥
नारी बांधी रेविला[2] ती[3] । टोंकें दोन करीं धरि ती ॥

---

१, ह्याचा कर्ता ' भावना ' २, ताक घुसळण्याची रवि. ३, दोरी.

मग फिरवीते,
रवि ती फिरते,
टोंकें बघते,

दोन रवी बघते टोंकें । म्हणे " मला देती झोंके " ॥
तैसी द्वैतांची जोडी । फुगडीला 'तूं-मी' च गडी ॥ ४ ॥

'मी–तूं' टोंकें हीं साचीं । कोणा एका दोरीचीं ॥
इतरहि सारीं हीं द्वैतें । टोंकें एका दोरीतें ॥
जीवां बांधुनि ही दोरी[1] । फिरवी कुणि दिव्या नारी ॥
महाकारणाची चरवी । जीव त्रिलोकीं फिरे रवी[2] ॥

'अनुभव' मग तें,
लोणी निघतें,
चरवी भरते,

खाय सांवळा चोरुनि जें । गोपी जीव तदा साजे ! ॥
नारी–दोरींची फुगडी । फुगडीला 'तूं-मी' च गडी ! ॥५॥

[ २ ]

फुगडी खेळति दिनरजनी । चक्राकारें नित फिरुनी ॥
संक्रांतीची मध्यें कडी– । वर्षें अयनांची फुगडी ॥

---

१, द्वैतांची. २, ताक घुसळण्याची रवि.

रविकर धरुनी ग्रहमाला । खेळति गगनीं फुगडीला ॥
फुगडी ऱ्हासोत्क्रांतींची । घडण तीच इतिहासांची ॥

ऐशा जोड्या,
भासती गड्या,
परि, रे वेड्या,

जरी गोड वा या जोड्या । परी खऱ्या नाहींत गड्या ॥
गोड, खरी रे ती फुगडी । जींत गडे 'तूं-मी' च गडी ॥ ६ ॥

रविशशि फुगडीचेच गडी । भासति बघतां ही जोडी ॥
तारानभही खेळगडी । विश्व खेळतें ही फुगडी ॥
विकल्प वा संकल्पांची । फुगडि, मनाची जननी ती ॥
जेथ बघावें तेथ गडे । जोडी फुगडी दृष्टि पडे ॥

मौज बघोनी,
ऐसी नयनीं,
स्वस्थ बसोनी,

चैन पडावी कशी गडे । मज फुगडीचा छंद जडे ॥
सुंदर आपण किति जोडी-। फुगडीला, 'तूं-मी' च गडी ! ॥ ७ ॥

भूतभविष्यांची फुगडी । वर्तमान ही मधें कडी ॥
कारणकार्यांची फुगडी । मनुजमनाची मधें कडी ॥
सन्निधदूरांची फुगडी । स्थलाभास ही खोटि कडी ॥
खेळ रंगला चोहींकडे । रंगानें ही भूल पडे ॥

हवें – नकों ची,
भल्याबुऱ्यांची,
गुणाऽगुणांची,

जोडी खेळे चोहिंकडे । चल, आपणही खेळुं गडे ॥
ये ये खेळुं गडे फुगडी । फुगडीला ‘ तूं-मी ’ च गडी ॥ ८ ॥

[ ३ ]

किती काळ खेळत आलों । खेळीं तें विसरुनि गेलों ॥
जिवासि वाटे फुगडि हवी । घडी न फुगडीविण जावी ॥
किती काळ खेळेन पुढें । हें तरि सांगिल कोण गडे ! ॥
आज परी फुगडीच हवी । नित्य गमे जी गोड नवी ॥

ऐसी फुगडी,
‘तूं-मी’ च गडी,
चाखुनि गोडी,

खेळुं घराच्या माघारीं । अज्ञानाच्या अंधारीं ॥
अष्टौ प्रहरीं सर्व घडीं । फुगडीला ‘तूं-मी’ च गडी ॥ ९ ॥

त्रास मधें मज किति झाला ! । जीव कितीदां तळमळला ! ॥
कांटे टोंचाति पायांला । तमीं दिसेना नयनांला ॥
येइ कळवळा जीवाला । अश्रुहि येती नयनांला ! ॥
पाय न त्यजि परि फुगडीला । काय म्हणूं या छंदाला ! ॥

कळे मज जरी,
वळेचि ना परि,
हाय रे हरी !

काय अशी ही गत झाली ! । कशी मला फुगडी जडली ॥
'तूं'हि अभागी मज जोडी । फुगडीला 'तूं-मी' च गडी ॥१०॥

उत्क्रांतीच्या गिरिशिखरीं । कूटस्थाच्या सानुवरी ॥
अद्वैताच्या चिदंबरीं । माझ्या मंगल माहेरीं ॥
अशी कधीं नव्हती फुगडी-। छळी सुखें परि करि वेडी ! ॥
माझें लग्न जुळे तुजशीं । खूळ जडे मग हें मजसी ॥

कारण याला,
कोण जाहला,
कळे न मजला,

समर्थ, जाणुनि, मी नोहे । तूं तरि थांबवि फुगडी हे ॥
तूंच मला आधार गडी-। फुगडीला 'तूं-मी' च गडी ॥११॥

[ ४ ]

अणुरेणूपरमाणूही । फुगडी खेळति मोदें ही ॥
त्यांतहि हरि नरनारि करी । त्यांतेंही फुगडी घेरी ॥

---

१, Positive and Negative or Male and Female

१९५५२

दृश्य जगातें तीच घडी । अणुपरमाणूंची फुगडी ॥
फुगडी कैची ?—रासचि तो । आजहि जो लपुनी घुमतो ॥

विश्वीं सारें,
एकचि बा रे,
रासचि वारें,

घुमतें दशदिग्जठरांत । अनंत ह्या आकाशांत ॥
तुजविण परि त्या नच गोडी । रासाला 'तूं-मी' च गडी ॥१२॥

मुकुंदजी " लालनलाला । सब दुनिया पालनवाला " ॥
रास रंगुनी खेळियला । स्वर्ग जयें नीरस केला ॥
आपण नव्हतों रासाला ! । मौज मिळाली गोपींला ॥
आतां 'मी' तितुकेहि हरी । 'तूं' तितुक्या त्या ब्रिजनारी ॥

त्या श्रीहरिपरि,
एकचि 'मी' तरि,
रूपें बहु धरि,

ये ये, रास पुन्हा खेळूं । पुनरपि रंग नवा उधळूं ॥
तुजविण नाहीं मज जोडी । रासाला 'तूं--मी' च गडी ! ॥१३॥

माझा 'मी' तो तुझाहि 'मी' । तुझाचि 'मी' तो माझा 'मी' ॥
एकचि असुनी दोनहि तो । दोनचि असुनी असंख्य तो ॥

---

१, ह्या गोड पालुपदाचें एक हिंदी पद आहे.

असंख्य, दोनहि एकहि जो । तोचि अशी लीला करितो ! ॥
साक्षी एकपणें डोले । दोनपणें फुगडी खेळे ॥

तोचि खेळतां,
असंख्य गमतां,
रास तोचि हा !

रासहि, फुगडी, साक्षी तो । एकचि नानापरि रमतो ॥
परी मौज ही शक्य करी । तिथें मूळ 'तूं-मी' च गडी ॥१४॥

रासाचें मज वेड जडे । रासाविण ना चैन पडे ॥
चल ये आपण खेळुं गडे । आपणही खेळूंच गडे ! ॥
रडलों हंसलों तरि खेळूं । विश्वीं रंग नवा उधळूं ! ।
रंग उडाला चोहींकडे । चंड रास हा घुमत चढे ॥

रंग मातला,
विश्वीं भरला,
असह्य झाला !

माया-ईशांची फुगडी । ती फुगडी हें विश्व घडी ॥
अशी जरी झाली फुगडी । फुगडीला 'तूं-मी' च गडी ! ॥१५॥

# कुंजवीणा

( चाल—वधू ही वल्ली. )

वृत्ति हाले ना । कुंजांत वाजली वीणा ॥ ध्रु० ॥

सुगंध सुंदर, रूप मनोहर ।
स्वाद हर्षकर, नाद चित्तहर ॥
स्पर्श सुधाकरशीतल सुखकर ।
मिसळिलें यांना, तरि सौख्य तेंवि होई ना ॥१॥

जवळीं जो त्यालाहि कळे ना ।
ऐकूं येते याला वीणा ॥
ज्याची त्याला परि विसरे ना ।
ऐकुनी वीणा, लागतें वेड जीवांना ॥ २ ॥

जीवातें तो नाद भेदितो ।
कणाकणांना आंत झोंबतो ॥
सुख तो आत्यंतिक परि देतो ।
मीठ जलिं जाणा, विरविते जीव ती वीणा ॥ ३ ॥

निरोप आला माहेराचा ।
जीव रिझाला तयिं कन्येचा ॥
विसर ये सासरिंच्या दुःखाचा ।
आठव सौख्याचा, रंजवी गांजल्या प्राणा ॥ ४ ॥

अंतर कोंदें मंजुल नादें ।
गानचि गमलें विश्व भोंवतें ॥
प्रथमचि आतां ऐकियलें तें ।
देतसे काना, लोभला जीव त्या गाना ॥ ५ ॥

मिळेल जितुकें अधिक तयाला ।
गोडचि वाटे तितुकें त्याला ॥
धुंद होउनी पीत रसाला ।
वाजते वीणा, गुंतला जीव रसपाना ॥ ६ ॥

शुद्धप्रेमा फुटला पान्हा ।
बेसुर चुकुनी मधें येइ ना ॥
संतत सुस्वर चाले वीणा ।
काय शब्दांना, योजुं मी दाविण्या वीणा ! ॥ ७ ॥

जीव गुंगला गोड रवानें ।
फुटों पाहतो प्राण सुखानें ॥
अनर्थ केला मंजुळ गानें ।
कुणी बोले ना, जीवासि सौख्य सोसे ना ॥ ८ ॥

ऐसा रव तो आला कानीं ।
जगिं जे बेसुर, सुस्वर दोन्ही ॥
मंजुळ साधन नादवर्धनीं ।
नाद खवळे तो, सुख दुःख दोन्हि घेतांना ॥ ९ ॥

कुणि बोले ना, कुणि चाले ना ।
शांत सर्वही कांहिं हले ना ॥
देवाघरची वाजे वीणा ।
सूर बिघडे ना, वाजली गोड ती वीणा ॥ १० ॥

कुंजावरिचे खगहि थांबले ।
पान थांबलें, फूल थांबलें ॥
विश्व थांबलें, – शांत जाहलें ।
गानरसपाना, थांवला जीवमृगराणा ॥ ११ ॥

अतिशय जीवें कष्ट सोशिले ।
अती झगडिलें, अती सोशिलें ॥
शिणुनी थकुनी सर्व सोडिलें ।
श्रांत पांथातें, शांतिची झोंप सुखवीते ॥ १२ ॥

अघोर रजनी कठीण गेली ।
प्रभा गोमटी अतां फांकली ॥
प्रभातवेला मंगल झाली ।
आली हो आली, रमणीय उषा श्रांताला ॥ १३ ॥

जीवनदी ही फार भटकली ।
कडेदऱ्यांनीं फार गांजिली ॥
अखेर उदधीसन्मुख आली ।
भ्रांत हरिखानें, पाहते जीवितेशाला ॥ १४ ॥

वृष्टी झाली शांतिसुधेची ।
भूमी भिजली तई जीवाची ॥
रोपें फुटलीं सर्व शुभांचीं ।
राख अशुभांना, वाजतां करी ती वीणा ॥ १५ ॥

ऐका ऐका कोणी वीणा ।
कुणासि कांहो ऐकुं येइ ना ॥
स्पष्ट येत हा रव ऐकाना ।
भाग्य मिळवाना, ऐकण्या गोड ती वीणा ॥ १६ ॥

वाज वाज गे माझ्या वीणे ।
सुखी न होई जीव तुजाविणें ॥
शांतिवांचुनी काय हें जिणें ।
धन्य नर जाणा, ऐकिली जयें ही वीणा ॥ १७ ॥

[ २ ]

विवेक, वैराग्यही, भक्तिही ।
तसाचि चवथा सदाचारही ॥
वीण्यालागीं खुंट्या चाऱ्ही ।
यत्न करितांना, मग चढोनि लागे वीणा ॥ १८ ।

महाकारणा 'षड्ज' धरियला ।
जडदेहाचा 'घोर' लाविला ।।
लिंगकारणां 'जोड' बनाविला ।
मोहिनी वीणा, गातसे जीव हा गाना ।। १९ ।।

ऐकुनि ऐकुनि जीव रंगला ।
स्वयेंचि गाणें होऊं शिकला ।।
बेसुर सारा विसरुनि गेला ।
मुक्त जीवांना, हर्ष ती ऐकुनी वीणा ।। २० ।।

सुस्वरतेची कमाल झाली ।
ऐशी वीणा गोड लागली ।।
समाधानवृत्तीहि जन्मली ।
लावितां वीणा, अंकिं घे त्यासि गुरुराणा ।। २१ ।।

अंकीं घेतां अंगाचे झाला ।
भिन्न कधीं नच पुन्हा निघाला ।।
सर्व न हो परि अंग जाहला ।
मुक्तजीवांना, जन्मला तान्हुला तान्हा ! ।। २२ ।।

# मी

सुटले तेजाचे वारे । तेज मला घाली घेरे ।
वारा सुटला जोराचा । पाउस पडला तेजाचा ॥

देह हातिंचा हा सुटला । जीव कशालासा मुकला ।
झाली इच्छांची होळी । वारा तेजाचा जाळी ॥

आहे लोपें मन न कळे । फोवारे तेजीं सगळे ।
सुटले तेजाचे वारे । जाळिति विश्वा एकसरें ॥

नाम उडालें वाऱ्यांत । रूप जळालें तेजांत ।
नामें नभि ज्यां पाहियलीं । चक्राकारें तीं फिरलीं ॥

झोत आक्रमी तेजाचा । चूरा झाला हो त्यांचा ।
चूरा पडला तेजांत । तेज शिरे तज्जठरांत ॥

तेजचि नामेंही झालीं । वस्तू वस्तुपणा मुकली ।
गेलों वस्तूच्या जवळ । तिचे जाहले हो हाल ॥

तेजें केला कल्लोळ । कांहिं न उरलें परि जाळ ! ।
जाळामधुनी गंभीर । 'मी' निघताहे निरंतर ॥

'मी' नच मजला तो कळला । लोंढा तेजाचा आला ।
मजवरुनी तो ओसरला । मी तो एकचि 'मी' झाला ॥

'मी' भरला या विश्वांत । तेज कोंदलें गगनांत ।
वारा जोराचा सुटला । विश्व जाळुनी हा आला ॥

जगतें सारीं हीं भवतीं । मी त्यांच्या मध्यावरती ।
गर्जुनि मीं गंभीर रवें । ' मी ! ' म्हणुनी जैं बोलावें ॥

'मी' च दिशा दाही वदती । कालस्थलही 'मी !' म्हणती ।
आकाशेंही 'मी !' म्हाणिलें । प्रतिध्वनीनें विश्व हले ! ॥

'मी !' म्हणतां मी गगनांत । 'मी' च निघाला ताऱ्यांत ।
'मी !' रव उठला चंद्रांत । 'मी !' च प्रतिध्वनि रवि देत ॥

विश्व जणूं ही गुहा कुणीं । 'मी' म्हणतां 'मी' प्रतिध्वनी ।
आकाशीं उडतां पक्षी । खालीं जग हें जणुं लक्षी ॥

तैसा तेजाचा पक्षी । झालों विश्वाचा साक्षी ।
गुह्य सृष्टिचें मज कळलें । तादात्म्यानें सकल कळे ।
' तदात्मता ' कीं ' तल्लीन ' । यांतचि सगळें थोरपण ॥

# तुऱ्याचें गाणें

( रा " गोविंदाग्रज " ह्यांची " कलगीचें गाणें " या नांवाची एक कविता ' मनोरंजना ' च्या जानेवारी १९१४ च्या अंकांत प्रसिद्ध झाली आहे. " तुऱ्याचें गाणें " हें त्या कवितेस उत्तर आहे. )

'गोविंदाग्रज' कविचतुरा। कलगीवरि तव ऐक तुरा ! ॥ ध्रु० ॥
"वेडा" नच मी पुरा पुरा। परि मी वेडा खराखुरा।
आहें वेडा खराखुरा। करि चतुरा म्हणुनीच तुरा।
अर्थ मनाला मम बाणे। घेतो म्हणुनी तव गाणें।
सवाल घेतों–तुरा करीतों–जबाब देतों,
'गोविंदाग्रज' कविचतुरा। कलगीवरि तव ऐक तुरा ! ॥ १ ॥
झालें तुजला जें सखया। तेंचि जाहलें जीवा या।
पाहियलें जें त्वां नयनीं। स्मरतें ऐकुनि तेंच मनीं।
म्याहि पाहिलें तेंच जरा। करि चतुरा म्हणुनीच तुरा।
जबाब देतों–प्रेमें देतों–ऐक गड्या तो,
पटला जरि हा तुला जरा। तरि जमला मग खरा तुरा ! ॥ २ ॥

---

१, उत्तराकरितां श्री० 'गोविंदाग्रज' ह्यांच्या "कलगीं" तील जे शब्द घेतले आहेत ते दुहेरी अवतरणचिन्हांत घातले आहेत. —व. ग. खा.

शोकापासुनि तूं अपुलें । गाणें कवि रे, सुरु केलें ।
कां रे परि तूं गाळियलें । आधीं त्याच्या जें झालें ।
"एक वेळ" ची "आवडती" । "सारंगी" तव "जी होती" ।
प्रथम वाजली–सहज वाजली–कशी वाजली
नच कळतां जें रवा करी । कां त्वां स्थिति ती गाळियली ? ॥३॥

प्रथम वाजली सारंगी । सारंगीपण ये अंगीं ।
साखर विरते दुग्धांत । किंवा कापुर वाऱ्यांत ।
जीव तसा विरला तींत । सारंगीपण त्या येत ।
काय मौज ती–शांति घोर ती–शांति गोड ती,
कोण म्हणे 'मी वर्णिन ती' । शब्द जिथें सारे सरती ! ॥ ४ ॥

सद्गुण सर्वहि सहजचि ते । कुकल्पना मन ना शिवते ।
ईश्वर आला करीं गमे । 'ईश्वर मीहि' हें वाणे ।
मनहि पूर्ण ये ताब्यांत । त्रास द्यावया असमर्थ ।
जरी क्षोभलें–जरा पाहिलें–कीं तें शमलें,
बहार ऐशी वदूं किती । नाहिं तयाला नाहिं मिती ! ॥ ५ ॥

आनंदाविण मग कांहीं । भानाचि जीवाला नाहीं ।
कांहिं घडो जगतीं बाह्य । अंतरिं आनंदचि होय ।
सुखदुःखें हीं मावळलीं । वृत्ती आनंदचि झाली ।
सद्गुणनामा–वदली जिव्हा–तरिही तेव्हां
तुफान आनंदाचें तें । अंतरिं गोड किती उठतें ! ॥ ६ ॥

शांत पयोदधिचेंचि परी । वृत्ति राहते निरंतरीं ।
कांहीं घडतां बाहेरी । शांत विचारा नित्य करी ।
निश्चय शीघ्र तशी करिते । गोंधळुनी नच बावरते ।
काल हा जसा–सूर्य वा जसा–मनुज तो तसा
चालत नित्यचि संथपणें । सारंगीपण ज्या बाणे ॥ ७ ॥

बिंब उदेलें हृदयिं असें । शांतीचा जें चंद्र असे ।
ज्ञानाचा परि सूर्य असे । जगतीं त्याला नांव नसे ।
सत्कृत्यांच्या ताऱ्यांना । नित्य जन्म दे असतांना ।
हृदयाकाशीं–रम्य उषेसी–प्रकाशराशी,
ज्ञानशांतिरविचंद्राला । जीव मोहुनी वश झाला ॥ ८ ॥

सारंगी वा वीणाही । अन्यहि वाना कांहींही ।
नांव तयाला परि नाहीं । 'शांति' वांचुनी अन्य महीं ।
जीव सुखानें कळवळतो । शांतिमधें तो विरघळतो ।
काय मौज ती–काय शांति ती–केविं शांति ती
ठाउक जगता या नाहीं । अंधारीं जग सारेंही ! ॥ ९ ॥

काय ठाउके तेव्हां कीं । ग्रहण येत त्या बिंबाही ।
राहू केतू कुणि आला । हाय, ग्रासितो बिंबाला ।
न कळे कोण अहो आला । क्रूर झांकितो बिंबाला ।
मौज मिळेना–चित्त रमेना–मग "करमेना"
स्थिति ऐसी जीवा येते । शत मरणांहुनि दुःखद ते ! ॥१०॥

नको हरी रे नको नको । कोणातेंही देउं नको ।
तशी स्थिती ती भयप्रदा । तीहुनि घोर नसे विपदा ! ।
"ढोल नगारे" मग "भंवतीं" । "नानापरि भेसुर रडती"
जीव उबगतो – जीव त्रासतो – जीव नको तो,
जीव परी तो जाई ना । चांडाळहि तो सोडी ना ! ॥११।

उपाय हरले जीवाचे । भूत उरावरिं तें नाचे ! ।
कितीहि झटतां हटतें ना । काय करावें समजे ना ।
निमुटपणें मग रडारडी । भाग सोसणें अशा घडी ! ।
डोकें शिणतें–चित्त भ्रमतें–भूत परी तें
नाच उरावरिं सोडी ना । जीवा क्षणभर करमे ना ! ॥१२।

अघोर वेला ग्रहणाची । भूतपिशाच्चप्रेतांची ।
संधि साधुनी ही, "गगनीं । कृष्णभयंकर मेघांनीं" ।
"दाटी केली" छळावया । सूख जिवाचें हरावया ! ।
सुख नेलें हो–कुणि धांवा हो–सुख तें द्या हो !
हिरावुनी सुख नेलें हो ! । धांवा हो कुणि धांवा हो! ! ॥१३।

कोण धांवतो साह्याला ! । जीव एकला राहीला ।
निराश होउनि बावरला । हताश रडतचि तो बसला ।
" स्वैरपणें हृदयीं शिरले । मस्तक मेघांनीं भरलें " ।
" मन घाबरलें—बहु बावरलें "—अती " भटकलें,"
"कांहिं सुचेना, समजेना" । रुचे न करमे "उमजेना" ॥१४।

 १८५४३

उदास तेव्हां जें वाटे । हताशता ती जी येते ।
डोकें तेव्हां जें फिरतें । हृदय विदीर्ण जसें होतें ।
खिन्न किती तेव्हां वाटे । धगधग सर्वान्तर जळतें ।
अनुभवहीनां–घोर यातना–कधिं कळती ना,
कितिही तुम्ही वर्णाना । चिता न ती समजेचि जनां ! ॥१५॥

“ नाहिंपणाचा डोंगर तो ” । जीवा सन्मुख मग दिसतो ।
जीव पाहुनी घाबरतो । अन्य बघाया कांहीं तो ।
अतिशय अंतरिं तळमळतो । अति झटुनी तो धडपडतो ।
परी दिसे ना—कांहीं नयनां—नग हाले ना
तोचि तमोनग दिसे पुढें । जीव एकला !—बघुनि रडे !॥१६॥

पाहियलेसें हें ज्यानें । पूर्णपणें तो नर जाणे ।
काय सौख्य विस्तव खाणें । घरामधें जगतां जळणें ! ।
विशीर्ण मग यातनांसवें । तोचि “ ओरडे दीर्घ रवें ” ।
जरि मज मरणें—जळोनि मरणें—अखेर रडणें,
तरी सौख्य हें भोगुं तरी । मन मोकलुनी रडूं तरी !! ॥१७॥

जरी एकला मी आहे । ऐसें जीवा गमताहे ।
तरि तो साक्षी सर्वांचा । त्राता दुर्बल दीनांचा ।
सर्व काल सन्निध आहे । धारिष्टा कसुनी पाहे ।

१, सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥
—श्रीसमर्थ.

REFBK-0019542

REFBK-0019542